रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड मंगळवार । दि. ११ ऑगस्ट २०२६ । अंक ६६। पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

### आंबेनळी घाट १६ ऑगस्टपर्यंत वाहतुकीस बंद

**अलिबाग :** अतिवृष्टी आणि घाट परिसरातील धोकादायक भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन पोलादपूर-आंबेनळी घाट महाबळेश्वर राज्य महामार्ग (एसएच-१३९) सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी १६ ऑगस्टपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.घाट मार्गावर दरड हटविणे, नालेसफाई, संरक्षणात्मक कामे आणि संरक्षक भिंतींची दुरुस्ती अशी कामे सुरू असली तरी नैसर्गिक आपत्तीजन्य घटनांचा धोका कायम आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील काही •➤पान २ वर

### आज सभापतीपदासाठी लढत

**पनवेल :** पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती सभापतीपदाच्या निवडणुकीसाठी राजकीय हालचालींना वेग आला असून, 'अ' आणि 'ड' प्रभाग समितीच्या सभापतीपदासाठी भाजप-महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये थेट सामना रंगणार आहे. या दोन्ही प्रभाग समित्यांच्या सभापतीपदासाठी मंगळवार, दि. ११ ऑगस्ट रोजी निवडणूक होणार आहे.महापालिकेकडून जाहीर करण्यात आलेल्या उमेदवारी अर्जांच्या माहितीनुसार, 'अ' प्रभाग समितीच्या सभापतीपदासाठी भाजप-महायुतीकडून नगरसेवक रवींद्र अनंता भगत, तर •➤पान २ वर

## वे|ध|क

### शिक्षक भरतीच्या उमेदवारांना दिलासा

**पुणे :** महाराष्ट्रातील शिक्षक भरतीची प्रतीक्षा करणाऱ्या हजारो उमेदवारांना दिलासा मिळाला आहे. पवित्र पोर्टलवर प्राधान्यक्रम नोंदवून तो लॉक करण्याची मुदत आता १३ ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली आहे. पोर्टलवर एकाच वेळी मोठ्या संख्येने उमेदवार लॉगिन करत असल्याने तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. काही उमेदवारांना पात्रतेनुसार विषय व पदांची पसंती दिसत नसून, ओटीपी मिळण्यासही विलंब होत असल्याच्या तक्रारी होत्या. यापूर्वी ही मुदत ६ ते ११ ऑगस्ट अशी होती. मात्र तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन शिक्षण विभागाने दोन दिवसांची मुदतवाढ दिली आहे. आतापर्यंत ७६ हजार ३९४ उमेदवारांचे प्राधान्यक्रम जनरेट झाले आहेत.

### मराठा आरक्षण सुनावणी लांबणार?

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या सुनावणीला पुन्हा विलंब होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे यांची कोलकाता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्याची शिफारस सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने केंद्र सरकारकडे केल्याची माहिती आहे. न्यायमूर्ती घुगे यांच्या अध्यक्षतेखालील विशेष पूर्णपीठासमोर मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी सुरू आहे. त्यांची नियुक्ती कोलकाता उच्च न्यायालयात झाल्यास या प्रकरणाच्या सुनावणीवर परिणाम होऊन ती पुन्हा लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

### देहव्यापाराचा पर्दाफाश

**पनवेल :** खारघर सेक्टर-७ येथील स्पा सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली सुरू असलेल्या देहव्यापाराचा नवी मुंबई गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने पर्दाफाश केला. या कारवाईत तीन महिलांची सुटका करण्यात आली असून, स्पाच्या व्यवस्थापकासह एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून खातरजमा केल्यानंतर 'ग्रेसफुल टच सलून अँड स्पा'वर छापा टाकला. व्यवस्थापक आरिफ अजीज मन्सुरी याने बनावट ग्राहकाकडून पाच हजार रुपये स्वीकारल्याचे तपासात निष्पन्न झाले. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अलिबाग-रोहा मार्ग पुन्हा निविदेच्या विळख्यात

# 177 कोटींचा रस्ता कागदावरच!

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

२०१९ मध्ये सुरू झालेला तब्बल १७७.७९ कोटी रुपयांचा अलिबाग-रोहा मेगा रोड प्रकल्प सात वर्षांनंतरही पूर्णत्वाला गेलेला नाही. रस्ता अपूर्ण, पूल अपूर्ण आणि प्रवाशांचा त्रास कायम असताना प्रकल्पातील कागदोपत्री आर्थिक व्यवहारांनी आता नवा प्रश्न निर्माण केला आहे. उपलब्ध कागदपत्रांनुसार, संबंधित ठेकेदाराला तब्बल १०६ कोटी रुपयांचे बिल देण्यात आले आहे. त्यातच गुजरातमधील संबंधित कंपनीकडून काम काढून घेण्याच्या हालचाली सुरू असल्याची चर्चा सार्वजनिक बांधकाम विभागात आहे. त्यामुळे १७७ कोटींचा हा प्रकल्प पुन्हा नव्या निविदेच्या विळख्यात अडकण्याची शक्यता असून, रस्त्याचे काम आणखी लांबण्याची भीती व्यक्त होत आहे.

अलिबाग आणि रोहा या दोन तालुक्यांना जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग अनेक वर्षांपासून अरुंद आणि वाहतुकीच्या दृष्टीने त्रासदायक ठरत आहे. अलिबाग-रोहा रस्त्याच्या कामासाठी तब्बल १७७.७९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हॅमअंतर्गत मंजूर झालेल्या या प्रकल्पाचे काम गुजरातमधील अग्रवाल यांच्या मेसर्स जेआरए प्रकल्प प्रा.लि. या संस्थेला देण्यात आले आहे. या प्रकल्पांतर्गत अलिबाग-रोहा-साई (माणगाव) या सुमारे ८५.६३ किलोमीटर मार्गाचे दुपदरीकरण करण्यात येणार आहे. यातील सुमारे •➤पान २ वर




### ठेकेदार बदलता येतो का?

सामान्यतः ठेकेदार बदलण्याची प्रक्रिया सहज होत नाही. एनएचएआयच्या ऑगस्ट २०२५ च्या धोरण परिपत्रकानुसार, ठेकेदार बदलणे ही अनिष्ट पद्धत मानली जाते आणि प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय असा बदल करता येत नाही. नियमांचे उल्लंघन झाल्यास ठेकेदारावर काळ्या यादीत टाकण्यासह इतर दंडात्मक कारवाईची तरतूद असू शकते. हे नियम मॉडेल कन्सेशन ॲग्रीमेंट (एमसीए) आणि आरएफपीमध्ये नमूद आहेत. प्रकल्पाची गुणवत्ता, जबाबदारी आणि पारदर्शकता कायम राहावी, यासाठी ठेकेदाराची निवड निविदा प्रक्रियेत केली जाते. त्यानंतर ठेकेदार बदलण्यासाठी विशेष कारणे आणि पूर्वमंजुरी आवश्यक असते.

### २०१९ ची निविदा; २०२० मध्ये कंपनीची स्थापना

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माहितीनुसार, हा प्रकल्प महाराष्ट्र रोड इम्प्रूव्हमेंट प्रोजेक्ट (एमआरआयपी) पॅकेज अंतर्गत आहे. निविदा क्रमांक २०१९ पीडब्ल्यूआर ४४३१२०१ अंतर्गत रायगड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांनी १६ डिसेंबर २०१९ रोजी एमएस जेआरएआयपीएल-एमआयसीपीएल कन्सोर्टियम (जे.व्ही.)ला लेटर ऑफ अवॉर्ड (एलओए) जारी केले होते. या कन्सोर्टियमने २२ फेब्रुवारी २०२० रोजी एसपीव्ही प्रस्ताव सादर केला. त्याच्या आधारे मेसर्स जेआरए अलिबाग रोड प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी तयार करण्यात आली. या कंपनीमध्ये जुगलकिशोर अग्रवाल आणि सतीश वासुदेव धारप हे दोन संचालक आहेत.

### अनेकदा फुटले नारळ

अलिबाग-रोहा हा रायगड जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. गेल्या अनेक वर्षांत या रस्त्याच्या कामाची सुरुवात अनेकदा झाली. भूमीपूजन आणि नारळफोडीचे कार्यक्रमही झाले; मात्र प्रत्यक्ष रस्त्याचे काम अपेक्षित गतीने पूर्ण झालेले नाही. आता संबंधित कंपनीचा ठेका काढून पुन्हा उपनिविदा काढली गेल्यास 'रस्ता पूर्ण कधी होणार?' हा प्रश्न पुन्हा अनुत्तरित राहण्याची शक्यता आहे. निविदा प्रक्रियेतच प्रकल्प पुन्हा अडकला, तर नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कागदोपत्री प्रगतीपेक्षा प्रत्यक्ष कामाला वेग देण्याची मागणी जोर धरत आहे.

## विद्यार्थ्यांवर लाठीहल्ला अन् पाण्याचा मारा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

झारखंडची राजधानी रांची येथे जेपीएससी-जेएसएससी परीक्षेतील कथित अनियमिततेविरोधात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला सोमवारी हिंसक वळण लागले. विधानसभेला घेराव घालण्यासाठी निघालेल्या विद्यार्थ्यांनी बॅरिकेड्स तोडण्याचा प्रयत्न केल्यानंतर पोलीस आणि आंदोलकांमध्ये जोरदार संघर्ष झाला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी विद्यार्थ्यांवर पाण्याचा मारा करत लाठीचार्ज केला. प्रत्युत्तरादाखल संतप्त विद्यार्थ्यांनी पोलिसांच्या दिशेने चपला आणि बूट फेकल्याने आंदोलनस्थळी मोठा तणाव निर्माण झाला.

जेपीएससी-जेएसएससी परीक्षेतील कथित अनियमिततेच्या निषेधार्थ विद्यार्थी आंदोलन करत आहेत. सोमवारी आंदोलकांनी विधानसभेला घेराव घालण्याचा निर्धार करत विधानभवनाच्या दिशेने कूच केली. पोलिसांनी त्यांना रोखण्यासाठी बॅरिकेड्स उभारले होते. मात्र, आंदोलक विद्यार्थ्यांनी बॅरिकेड्स ओलांडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलिसांनी प्रथम आंदोलकांना थांबविण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात आल्यानंतर पाण्याचा मारा आणि लाठीचार्ज करण्यात आला. लाठीचार्जच्या कारवाईचे समर्थन करत रांचीचे पोलीस प्रमुख पारस राणा यांनी सांगितले की, पोलिसांनी आंदोलकांना वारंवार समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, आंदोलक बॅरिकेड्स तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न करत होते.

### विधानसभेला घेराव घालताना मोठा राडा



### पोलिसांची गुंडागर्दी

आंदोलक विद्यार्थ्यांनी पोलिसांच्या कारवाईवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नियमानुसार लाठीचा वापर कमरेच्या खाली करणे अपेक्षित असताना पोलिसांनी डोके, हात आणि चेहऱ्यावर लाठ्या मारल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. पोलिसांच्या गुंडागर्दीमुळे आंदोलक विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. त्यामुळे आगामी काळात राज्य सरकार आणि पोलिसांविरोधात आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

### दहा दिवस उलटूनही आरोपी फरार



**। पेण । प्रतिनिधी ।**

मयूर वनगे यांना झालेल्या अमानुष मारहाण प्रकरणाला दहा दिवस उलटूनही चारही आरोपी पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. त्यामुळे या प्रकरणातील पोलीस तपासाबाबत नागरिकांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप वाढल्याची चर्चा सध्या सुरू आहे. राजकीय दबावामुळेच आरोपींना अटक होत नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

दैनिक कृषीवलच्या हाती लागलेल्या छायाचित्रांवरून मयूर वनगे यांना झालेल्या •➤पान २ वर

## मुलाने केली आईची गळा आवळून हत्या

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

वाशी सेक्टर-११ येथील अष्टविनायक सोसायटीमध्ये रविवारी सायंकाळी खळबळजनक हत्या घडल्याची घटना समोर आली आहे. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, ४२ वर्षीय मुलाने आपल्या ६५ वर्षीय आईची गळा आवळून हत्या केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी वाशी पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, मृत महिलेचे नाव नंदा कदम (६५) असून, आरोपीचे नाव महेश कदम (४२) आहे. दोघेही वाशी सेक्टर-११ येथील अष्टविनायक सोसायटीमध्ये राहात होते. प्राथमिक तपासात आरोपी आपल्या आईच्या वागणुकीवरून नाराज असल्याचे समोर आले आहे. आरोपीचा आरोप होता की, त्याची आई त्याच्या पत्नीला पुरेसे महत्त्व देत नव्हती तसेच मुलीची बाजू घेत होती. याच कारणावरून आरोपीच्या मनात आईविषयी नाराजी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

९ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे ६ ते रात्री ९.५० •➤पान २ वर

विनम्र अभिवादन



शालिनीताई जयराम पाटील

शोकाकुल

सौ. शैलजा घरत, नागाव, नवी मुंबई

## खैरतस्करांना ठोकल्या बेड्या

### बोलेरो पिकअपसह ओंडके जप्त



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन रोडवरील धनगरमलई परिसरात खैराच्या लाकडांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या बोलेरो पिकअपवर दिघी सागरी पोलिसांनी कारवाई केली. गस्तीदरम्यान संशयास्पद वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये खैराच्या लाकडाचे सुमारे ३० ते ३२ ओंडके आढळून आले. पोलिसांनी वाहनासह दोघांना ताब्यात घेतले असून, जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी वनविभागाकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मेंदाडकर हे पोलीस पथकासह धनगरमलई परिसरात गस्त घालत असताना एमएच ०५ ईएल ०९१६ क्रमांकाची बोलेरो पिकअप संशयास्पदरीत्या आढळून आली. पोलिसांनी वाहनाची •➤पान २ वर

### किहीममध्ये घरफोडी करणारे गजाआड

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील किहीममधील कामथ येथील घरात घुसून चोरट्यांनी घरफोडी केली होती. मांडवा पोलिसांनी अवघ्या दहा दिवसांत हा गुन्हा उघडकीस आणला असून, या गुन्ह्यातील दोघांना गजाआड करण्यात आले आहे. आरोपींमध्ये गावातील तरुणाचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, किहीम परिसरातील कामथ येथील दर्शना काठे यांच्या घरात घुसून चोरट्यांनी २५ ते ३० जुलै या कालावधीत घरफोडी केली. लोखंडी कपाटातील लॉकरमधून दोन •➤पान २ वर

## एसटी बस अपघातात १४ प्रवासी जखमी

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड-दापोली राज्य मार्गावरील कुर्ला दिवेकरवाडी येथे दोन एसटी बसची समोरासमोर धडक होऊन १४ प्रवासी तसेच दोन्ही बसचे चालक व वाहक किरकोळ जखमी झाले. जखमींना महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महाड एसटी आगारातून महाड-मुमुर्शी-मंडणगड ही बस (एमएच २० बीएल ३९९५) मंडणगडच्या दिशेने जात होती. कुर्ला दिवेकरवाडी येथे वळणावर समोरून येणाऱ्या फाळकेवाडी-मुंबई एसटी बसची समोरासमोर धडक झाली. या अपघातात १४ प्रवाशांसह चालक व वाहकांना किरकोळ दुखापत झाली. विठ्ठल बरकडे, राधिका साकडे, प्रियांका सकपाळ, गोपाळ सकपाळ, सुरेखा भोसले, प्राची सकपाळ, प्रतीक भोसले, शीतल वाघमारे, तारा पवार, वैशाली कांबळे, प्रगती कासारे, कृष्णा साखरे, रुपेश लुसते, दिलीप उन्हाळे या प्रवाशांना दुखापत झाली आहे.

Shree Gopinath Mahadev Vedak Pratisthan's

G.M. VEDAK INSTITUTE OF TECHNOLOGY,TALA

APPROVED BY AICTE & DTE GOVT. OF MAHARASHTRA & AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI



CIVIL ENGINEERING

COMPUTER ENGINEERING

MECHANICAL ENGINEERING

ADMISSION OPEN

FIRST YEAR & DIRECT SECOND YEAR

ACCREDITED WITH GRADE B NAAC

Institute Code : 3447

www.gmvit.com

principal@gmvit.com

Dr. Dilip N. Jaiswal, Principal, 9022802204

Prof. S.N. Jadhav, Admission Incharge, 9022938458

Prof. K.P. Risbud, Asst. Admission Incharge, 8087898571

Prof. Jitesh Bhagat, Asst. Admission Incharge, 9021663422

At. Post & Taluka : Tala, Dist - Raigad, Maharashtra - 402111

**रायगडमधील तीन निराधार बालके दत्तक | हक्काचे मिळाले कुटुंब**

## बालकांना मिळाला मायेचा आधार!

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील तीन निराधार बालकांना मायेचा आधार मिळाला आहे. महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात आलेल्या दत्तक प्रक्रियेमुळे या बालकांना हक्काचे कुटुंब मिळाले आहे.

राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी जिल्ह्यातील दत्तक प्रक्रिया अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार रायगड जिल्हा प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत दत्तक प्रक्रियेला गती दिली आहे. दत्तक ग्रहण नियमावली, २०२२ अंतर्गत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा बाल संरक्षण समिती, रायगड किशन जावळ यांच्या परवानगीने जिल्ह्यातील तीन दत्तक प्रकरणांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये दोन संस्थात्मक दत्तक प्रकरणे असून, संस्थेतील बालकांना कायदेशीररित्या कायमस्वरूपी कुटुंब उपलब्ध करून देण्यात आले आहे. •➤पान २ वर

### दत्तक प्रक्रियेला अधिक गती देणार

प्रत्येक निराधार बालकाला सुरक्षित, प्रेमळ आणि कायमस्वरूपी कुटुंब मिळावे, यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असून, दत्तक प्रक्रियेला अधिक गती दिली जाईल. दत्तक प्रक्रिया ही निराधार बालकांच्या पुनर्वसनासाठी अत्यंत महत्त्वाची असून, समाजातील पात्र व इच्छुक दाम्पत्यांनी शासनाच्या अधिकृत प्रक्रियेद्वारे दत्तक घेण्यास पुढाकार घ्यावा, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाने केले आहे. इच्छुक दाम्पत्यांनी अधिकृत दत्तक प्रक्रियेसाठी नोंदणी करावी. पात्र व इच्छुक दाम्पत्यांनी अधिकृत दत्तक प्रक्रियेचा अवलंब करून निराधार बालकांना प्रेमळ व सुरक्षित कुटुंबाचा आधार द्यावा, असे आवाहन महिला व बाल विकास विभागामार्फत करण्यात आले आहे.



# पाणीप्रश्नावर शेकाप आक्रमक

## ■ १४ ऑगस्टच्या उपोषणाला जाहीर पाठिंबा



। पनवेल । प्रतिनिधी ।

ऐन पावसाळ्यातही कामोठेकरांना पुरेसा आणि नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने पाणीप्रश्न गंभीर बनला आहे. या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून, पक्षाच्या वतीने कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देत तातडीने पाणीप्रश्न सोडवण्याची मागणी करण्यात आली.

शेकापचे जिल्हा सरचिटणीस तथा माजी नगरसेवक शंकर म्हात्रे यांनी कार्यकारी अभियंत्यांसमोर कामोठेकरांच्या पाणीसमस्येची तीव्रता मांडली.

मागील वर्षीही शेकापच्या माध्यमातून पाण्यासाठी आंदोलन करण्यात आले होते. मात्र, वारंवार पाणीप्रश्न निर्माण होत असल्याने प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अन्यथा आगामी काळात शेकापच्या वतीने मोठे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा म्हात्रे यांनी दिला. पालिका ते आमदार-खासदार अशा सर्व स्तरांवर सत्ताधारी भाजपचे प्रतिनिधित्व असतानाही कामोठेकरांचा पाणीप्रश्न सुटत नाही, ही खेदाची बाब असल्याची टीका त्यांनी केली. १४ ऑगस्ट रोजी नागरिकांकडून करण्यात येणाऱ्या आमरण उपोषणाला शेकापचा जाहीर पाठिंबा असून, नागरिकांच्या हक्काच्या पाण्यासाठी पक्ष कायम त्यांच्या सोबत राहील, असेही शंकर म्हात्रे यांनी स्पष्ट केले.

यावेळी माजी नगरसेवक प्रमोद भगत, राष्ट्रवादी काँग्रेसचे कामोठे अध्यक्ष महेंद्र पाटील, शेकाप कार्याध्यक्ष गौरव पोरवाल, रमेश गोरे, मधुकर सुरते, कृष्णा म्हात्रे, कुणाल भेंडे, ज्येष्ठ नागरिक अध्यक्ष हरिचंद्र पाटील, अनिल पवार, ज्योती म्हात्रे, रोहन म्हात्रे, नाना भगत, सर्जेराव माने, शिवाजी आहेर, उत्तम मगर यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

## पान १ वरून

### १७७ कोटींचा रस्ता कागदावरच!

१२ किलोमीटर रस्ता काँक्रिटचा करण्यात येणार आहे. मात्र, मार्गाचे रुंदीकरण आणि मजबुतीकरण गेल्या काही वर्षांपासून संथ गतीने सुरू आहे.

या मार्गावर तब्बल २३ पुलांची नव्याने उभारणी करण्यात येणार आहे. वढाव ते खानाव मार्गावरील दोन पुलांची कामे सुरू करण्यात आली असली तरी तीदेखील अद्याप अपूर्ण आहेत. रस्त्याचे रखडलेले काम, अपूर्ण पूल आणि निकृष्ट बांधकामाच्या तक्रारींमुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. रस्ता आणि पुलांची कामे नेमकी कधी पूर्ण होणार, असा सवाल प्रवासी आणि स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या रस्त्याचे सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा केला जात आहे. मात्र, संबंधित गुजरातमधील कंपनीकडून काम काढून घेण्याच्या हालचाली सुरू असल्याची चर्चा विभागातच आहे. ठेका काढून घेतल्यास उर्वरित कामासाठी पुन्हा नव्याने उपनिविदा काढावी लागणार आहे. त्यामुळे आधीच वर्षानुवर्षे रखडलेल्या या रस्त्याच्या कामाला आणखी किती काळ लागणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

**अर्थसंकल्पातून पुलांना नवसंजीवनी?**

या मार्गावरील अनेक जुने पूल सध्या धोकादायक अवस्थेत आहेत. काही पुलांची अवस्था अत्यंत दयनीय असून, त्यावरून वाहतूक करणेही धोकादायक ठरत आहे. असे असतानाही या पुलांवरून अवजड वाहनांची ये-जा सुरूच आहे. त्यामुळे या पुलांची नव्याने उभारणी करणे अत्यावश्यक बनले आहे. राज्याच्या अर्थसंकल्पातून या पुलांच्या कामांना मंजुरी घेण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. रस्ता, पूल आणि पर्यटन या तिन्ही दृष्टीने महत्त्वाचा असलेला अलिबाग-रोहा मार्ग आता तरी कागदावरील मंजुरीतून प्रत्यक्ष कामाच्या दिशेने कधी येणार? याकडे संपूर्ण रायगडचे लक्ष लागले आहे.

### आज सभापतीपदासाठी लढत

त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून नगरसेविका योगिता समीर फडके यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे 'अ' प्रभाग समितीच्या सभापतीपदासाठी दोन्ही आघाड्यांमध्ये थेट लढत होणार आहे.

त्याचप्रमाणे 'ड' प्रभाग समितीच्या सभापतीपदासाठी भाजप-महायुतीकडून नगरसेवक अजय तुकाराम बहिरा यांनी उमेदवारी दाखल केली आहे. त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून नगरसेविका मनीषा अनंत म्हात्रे मैदानात उतरल्या आहेत. त्यामुळे 'ड' प्रभाग समितीमध्येही भाजप-महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी रंगतदार लढत होणार आहे.

दरम्यान, 'ब' आणि 'क' प्रभाग समिती सभापतीपदासाठी विरोधकांकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आलेला नसल्याने भाजपच्या उमेदवारांची बिनविरोध निवड होण्याची शक्यता आहे. 'ब' प्रभाग समितीच्या सभापतीपदासाठी मधु दौलतराव पाटील, तर 'क' प्रभाग समितीच्या सभापतीपदासाठी रवींद्र गणपत जोशी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

महापालिकेच्या नोंदीनुसार, सभापतीपदासाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी करून संबंधित उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली आहेत. त्यामुळे आता 'अ' आणि 'ड' प्रभाग समित्यांमध्ये भाजप-महायुती आपले सभापती निवडून आणण्यात यशस्वी ठरते का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

**चारपैकी दोन सभापती बिनविरोध होण्याची शक्यता**

पनवेल महापालिकेच्या चारही प्रभाग समिती सभापतीपदाच्या निवडणुकीत भाजप-महायुतीने आपली ताकद पणाला लावली आहे. मात्र 'ब' आणि 'क' प्रभाग समितीमध्ये भाजपच्या उमेदवारांविरोधात कोणताही अर्ज दाखल झालेला नसल्याने मधु पाटील आणि रवींद्र जोशी यांची निवड बिनविरोध होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे 'अ'मध्ये रवींद्र भगत विरुद्ध योगिता फडके, तर 'ड'मध्ये अजय बहिरा विरुद्ध मनीषा म्हात्रे अशी थेट लढत होणार आहे.

### मुलाने केली आईची गळा आवळून हत्या

वाजण्याच्या दरम्यान घरात वाद झाला. या वादातून संतापलेल्या आरोपीने आईचा गळा आवळल्याचा आरोप आहे. तसेच तिचे डोके फरशीवर आपटल्याचीही माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच वाशी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन अटक केली असून, हत्येमागील नेमके कारण आणि संपूर्ण घटनाक्रमाचा तपास सुरू आहे.

### दहा दिवस उलटूनही आरोपी फरार

दुखापतीचे गांभीर्य स्पष्ट होत असून, त्यांच्यावर अत्यंत क्रूर पद्धतीने मारहाण करण्यात आल्याचे दिसून येते. या मारहाणीची दृश्ये पाहता, घटनेचे गांभीर्य अधिक प्रकर्षाने जाणवते.

या प्रकरणातील मुख्य आरोपी म्हणून भाजप जिल्हा उपाध्यक्ष मंगेश दळवी, हरेश दळवी, रुपेश दळवी तसेच पूल अपहार प्रकरणातील मुख्य आरोपी रंजीत दळवी यांची नावे चर्चेत आहेत. हे आरोपी जिल्हा सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी प्रयत्न करत असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, गंभीर स्वरूपाची मारहाण झाल्याचा आरोप असताना आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती न लागल्याने तपासाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. पोलिसांवर कोणताही राजकीय दबाव नसून तपास निष्पक्षपणे सुरू आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या प्रकरणात आरोपींना अटकपूर्व जामीन मिळतो की त्यांना पोलिसांच्या ताब्यात देण्यात येते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. मयूर वनगे यांच्यावर झालेल्या मारहाणीचे गांभीर्य आणि उपलब्ध पुरावे लक्षात घेता न्यायालय याप्रकरणी कोणता निर्णय देते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### बालकांना मिळाला मायेचा आधार!

तसेच एक नात्यांतर्गत दत्तक प्रकरण मंजूर करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे तीन बालकांना सुरक्षित, प्रेमळ व कायमस्वरूपी कुटुंबाचा आधार मिळाला आहे. ही संपूर्ण प्रक्रिया जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, संबंधित विशेष दत्तक संस्था तसेच केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण यांच्या समन्वयातून या ऑनलाइन प्रणालीद्वारे पारदर्शक आणि नियमानुसार पूर्ण करण्यात आली.

### आंबेनळी घाट १६ ऑगस्टपर्यंत वाहतुकीस बंद

दिवस अतिवृष्टीचा इशारा दिल्याने सार्वजनिक जीवित व मालमत्तेच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत हा निर्णय घेण्यात आला आहे. या कालावधीत नागरिकांनी आंबेनळी घाटाचा वापर करू नये, असे प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे.

### खैरतस्करांना ठोकल्या बेड्या

तपासणी केली असता त्यामध्ये तीन ते चार फूट लांबीचे खैराच्या लाकडाचे अंदाजे ३० ते ३२ ओंडके आढळून आले.

याप्रकरणी पोलिसांनी विठ्ठल भिकू हिलम (२९, रा. साई-काकळ, ता. माणगाव) आणि तुषार विनोद जाधव (२२, रा. खामगाव, ता. म्हसळा) यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून खैराच्या लाकडांसह बोलेरो पिकअप ताब्यात घेतली. दोन्ही संशयित तसेच जप्त मुद्देमाल पुढील तपास व कायदेशीर कारवाईसाठी वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

दिघी सागरी पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरातील बेकायदेशीर वृक्षतोड आणि लाकूड वाहतुकीवर अंकुश ठेवण्यास मदत होणार असून, अशा प्रकारांविरोधात पोलीस व वनविभागाने कारवाईची धडक मोहीम सुरू ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### किहीममध्ये घरफोडी करणारे गजाआड

लाख ३३ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता.

या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. अखेर दहा दिवस हा गुन्हा उघडकीस करण्यात आला.

चिराग काठे (१९) रा. किहीम-कामथ व करण पवार (२४) रा. भाल-पाटीलवाडा या दोन आरोपींना रविवारी (दि.९) अटक करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल, उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे, पोलीस निरीक्षक मांडवा सागरी सोमनाथ लांडे यांच्या मार्गदर्शनखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन मंडलिक तसेच पोलीस पथक वेगवेगळ्या पद्धतीने तपास करून चोरट्यांपर्यंत पोहोचले. गुन्ह्यातील चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्याची प्रक्रिया सुरू आहे.


**जाहीर सूचना**

याद्वारे सर्वसामान्य जनतेला **सूचना** देण्यात येत आहे की, (१) **श्रीमती सरोजिनी राहुल नार्वेकर** (**"मालक १"**) यानी आमच्या अशिलांना, महाराष्ट्र राज्यातील **रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात असलेल्या सोगाव गावातील** जमिनीचे भूखंड, ज्याचे अधिक तपशीलवार वर्णन खालील अनुसूची १ मध्ये दिलेले आहे (सामूहिकपणे **"मालमत्ता १"** म्हणून संबोधले जाईल), (२) **श्री मकरंद सुरेश नार्वेकर** (**"मालक २"**) यांनी आमच्या अशीलांना, महाराष्ट्र राज्यातील **रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात असलेल्या सोगाव गावातील** जमिनीचा भूखंड, ज्याचे अधिक तपशीलवार वर्णन खालील अनुसूची २ मध्ये दिलेले आहे (**"मालमत्ता २"**); आणि (३) मालक १ आणि मालक २ (या पुढे एकत्रितपणे **"मालक"** म्हणून संबोधले जाईल) यांनी आमच्या अशिलांना, खालील अनुसूची ३ मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केल्यानुसार, **महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात सोगाव गावातील** जमिनीचा भूखंड, ज्याचे अधिक तपशीलवार वर्णन खालील अनुसूची ३ मध्ये दिलेले आहे (**"मालमत्ता ३"**), यासह येथे असलेल्या जमिनीचा तुकड्यांचा भाग असलेल्या खाजगी रस्त्यावरील ९ (नऊ) मीटर रुंद कायमीस्वरुपी येणाच्या-जाण्याचा हक्कांच्या लाभासह, ज्याचे अधिक तपशीलवार वर्णन खालील अनुसूची ४ मध्ये दिलेले आहे (**"मालमत्ता ४"**), सर्व दावे, मागण्या आणि बोजांपासून मुक्त, स्पष्ट आणि विक्रीयोग्य मालकी हक्कासह विकण्यास सहमती दर्शवली आहे.

मालमत्ता १ आणि /किंवा मालमत्ता २ आणि /किंवा मालमत्ता ३ किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये विक्री, देवाण घेवाण, बेचनपत्र, गहाण, बोजा, भेट, विकास हक्क, फ्लोर स्पेस इंडेक्स, ताबा, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, भाडेकरार, उप-भाडेकरार, लीव्ह अँण्ड लायसन्स, धारणाधिकार, देखभाल, विश्वस्त संस्था, वारसा, उत्तराधिकार, व्यापण, व्यवसाय, मार्गाधिकार किंवा इतर सुखाधिकार, खटला, कोणत्याही न्यायालय किंवा न्यायाधिकरणाचा निर्णय, हुकूमनामा, आदेश किंवा बक्षीस किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणताही हिस्सा, अधिकार, मालकी, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/ किंवा मागणी असलेल्या व्यक्ति/संस्था ज्यामध्ये एखादी व्यक्ति, हिंदू अविभक्त कुटुंब, कंपनी, बँक(का), वित्तीय संस्था(थे), नॉन-बँकिंग वित्तीय संस्था(थे), फर्म, व्यक्तींचा समूह किंवा व्यक्तिंची संघटना अंतर्भूत असो किंवा नसो, सावकार आणि / किंवा कर्जदार यांच्या समावेश आहे, त्यांनी या द्वारे कृपया लेखी स्वरुपात याची माहिती सहाय्यक कागदोपत्रांसह निम्नस्वाक्षरीकारांना सिरिल अमरचंद मंगलदास, पेनिन्सुला चेंबर्स, पेनिन्सुला कॉर्पोरेट पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०००१३, भारत, येथे या सूचना प्रकाशन झाल्यापासून **१० (दहा)** दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा, अशा व्यक्ति किंवा व्यक्तिंचा कोणताही दावा, मागणी, हिस्सा, हक्क, मालकी किंवा हितसंबंध, जर असेल तर, ते माफ केले गेले आहेत आणि/ किंवा सोडले गेले आहेत असे मानले जाईल आणि मालक १ ची मालमत्ता १ वरील मालकी, मालक २ ची मालमत्ता २ वरील मालकी आणि मालक ३ ची मालमत्ता ३ वरील मालकी, सर्व प्रकारच्या दाव्यांपासून, मांगण्यापासून आणि बोजांपासून मुक्त, स्पष्ट आणि विक्रीयोग्य मानले जाईल आणि आमचे अशिल उपरोक्त मालमत्ता १, मालमत्ता २ आणि मालमत्ता ३ खरेदी करण्याची कार्यवाही करतील.

**अनुसूची १**
(मालमत्ते १ चे वर्णन)

(अ) गट क्र. ४/अ/१ असलेली, अंदाजे २३,१९८ चौरस मीटर क्षेत्रफळाची, रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात, सोगाव गावात स्थित असलेली सर्व मालकी हक्काची जमीन; आणि

(ब) गट क्र. १२७/१/१२ असलेली, अंदाजे ४,३१७ चौरस मीटर क्षेत्रफळाची, रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात, सोगाव गावात स्थित असलेली सर्व मालकी हक्काची जमीन;

**अनुसूची २**
(मालमत्ते २ चे वर्णन)

गट क्र. १२७/२० असलेली, अंदाजे ४,७२० चौरस मीटर क्षेत्रफळाची, रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात, सोगाव गावात स्थित असलेली सर्व मालकी हक्काची जमीन;

**अनुसूची ३**
(मालमत्ते ३चे वर्णन)

गट क्र. १२७/१/१४/१/२ असलेली, अंदाजे ४,०२९ चौरस मीटर क्षेत्रफळाची, रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात, सोगाव गावात स्थित असलेली सर्व मालकी हक्काची जमीन;

**अनुसूची ४**
(मालमत्ता १, मालमत्ता २ आणि मालमत्ता ३ यांच्या फायदासाठी ज्या भूखंडामधून कायमीस्वरुपी मार्गाधिकार जातो, त्या भूखंडाचे वर्णन)

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात, सोगाव गावात असलेल्या गट क्र. १२७/१/१८ असलेल्या मालकी हक्काच्या जमिनीचे सर्व तुकडे.

**सिरिल अमरचंद मंगलदास** करिता
सही/-
**ऋषिराज भट्ट**
भागीदार
दिनांक: ११-०८-२०२६



**भोराई शिक्षण प्रसारक मंडळ नांदगाव**
**ता. सुधागड जि.रायगड**
संस्था सांकेतांक क्रमांक : 272412SC002
पवित्र प्रणालीद्वारे शिक्षण सेवक भरती जाहिरात २०२६

आमच्या संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या १००% अनुदानित माध्यमिक विद्यालयात शिक्षण सेवकांच्या पुढीलप्रमाणे जागा भरावयाच्या आहेत.

| अ.क्र. | वर्ग | शैक्षणिक पात्रता | विषय | एकूण पदे |
|---|---|---|---|---|
| १ | इ.५ वी | एच्.एस्.सी.(सायन्य) डी.एड. | सर्व | १ |
| २ | इ.६ वी ते इ.८ वी | बी.एस्सी. बी.एड. | गणित-विज्ञान | २ |
| ३ | इ.६ वी ते इ.८ वी | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | १ |
| ४ | इ.९ वी ते इ.१० वी | बी.ए.बी.पी.एड | इंग्रजी | १ |

वरील जागा अनु.जमाती, भटक्या जमाती (ब). इडब्लुएस् (EWS) व एसईबीसी (SEBC) या प्रवर्गामधून भरती करावयाच्या आहेत.

१. इच्छुक व अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पसंतीक्रम नमूद करुन ऑनलाईन अर्ज करावेत.
२. मुलाखतीची तारीख पोर्टलवर पहावी.

अध्यक्ष,
**भोराई शिक्षण प्रसारक मंडळ नांदगाव**
**ता.सुधागड जि.रायगड**



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील परीशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकती विकसनार्थ करण्याच्या हेतुने विद्यमान मालक यांच्याशी बोलणी करीत आहे. सदर मिळकतीत इतर कोणाचाही विक्री देवाण-घेवाण, गहाण, वारसा, ताबा खरेदीखत, बक्षीस, मृत्यूपत्र वाटपपत्र वा इतर कोणत्याही प्रकारचा करारनामा वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास व मिळकतीबाबत विकसनकरार करणेबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्याच्या पृष्टर्थ सर्व कागदोपत्री पुराव्यासोबत खालील पत्त्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत लेखी सुचित करणे आवश्यक आहे. जर अशाप्रकारची कोणतीही लेखी हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर खालील नमुद केलेल्या मिळकतीशी कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल व ज्याचा कोणाचा कोणत्याही प्रकारे तथाकथित हक्क हितसंबंध इ. आहे तो जाणीवपुर्वक सोडून दिला आहे. असे समजून आमचे आशिल सदर मिळकतींचा प्रस्तुतची मुदतीनंतर सदर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत हरकत असल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही व आमचे अशिल सदर खालील नमुद केलेल्या मिळकतींचा विकसनकरारनामाचा व्यवहार पुर्ण करतील. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चिंचवली शेकीन, खोपोली नगरपालिका हद्दीतील तालुका खालापुर, जिल्हा रायगड येथील प्लॉट मिळकत**

| क्र. | सि.टी.एस. नं | क्षेत्रफळ (चौ.मी.) | मिळकतीचे मालक |
|---|---|---|---|
| १ | १६६०/१६६२/१६६३/१७८०/७ | ३०० | श्री. कुमार सुदाम चव्हाण |
| २ | १६६०/१६६२/१६६३/१७८०/५ | ३०० | श्री. गणेश दत्तात्रय गोसावी<br>सौ. हेमांगी गणेश गोसावी |

दिनांक :- ११.०८.२०२६
स्थळ :- खोपोली

**सौ. वैशाली सुनिल कराळे**
ॲडव्होकेट,
फ्लॅट नं.-५, वैभव - समृद्धी,
काटरंग, खोपोली,
ता. खालापूर, जि. रायगड. ४१०२०३


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी रुझी फली मुल्ला आणि टिना रुसी मुल्ला यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहीवाटीतील मौजे करचुंडे, ता.सुधागड, जि.रायगड येथिल पुढील प्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत त्यांचेकडुन आमचे अशिल बॉबी सिंह, रा. कुलाबा, मुंबई ४००००५, यांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे..

**शेत जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-करचुंडे, ता. सुधागड, जि.-रायगड येथिल**

| गट नं. | एकुण हे.-आर. चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ५८ | १-१७.४० | ७.६६ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील रुझी फली मुल्ला आणि टिना रुसी मुल्ला यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : ११/०८/२०२६.

**श्री.नरेश गोविंद शिंदे,** ॲडव्होकेट
पत्ता :- मु.पो.पाली भोईआळी,
ता.सुधागड, जि.रायगड ४१०२०५
मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक अमर गणेशप्रसाद गुप्ता यांचे यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे. कशेळे तालुका. कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | भूमापन क्रं व उपविभाग / सर्व्हे नं/हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| अमर गणेशप्रसाद गुप्ता | ३५/२/अ | १-०९-९९ | ०-४५ |
| अमर गणेशप्रसाद गुप्ता | ३४/३/अ | ०-२५-८० | ०-७० |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि तसेच त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतील जाणार नाही.

ता. ११/०८/२०२६

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता - प्रशाकीय भवन जवळ सरकारमान्य गाळा नं २
ता. कर्जत जि. रायगड.



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे उक्रुळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती त्या मिळकतींचे मालक अनंता पांडु सोमणे यांचेकडुन विकत घेणेचे विचारात आहेत.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ८६ | १ | १.८७.२० | ११.५३ |
| ८५ | ४अ | ०.१७.०० | ०.०२.०० |
| ८६ | २ | ०.०२.०० | ०.०३.०० |
| ९६ | २अ | ०.४२.०० | ४.६३ |
| ९६ | २ब | ०.२३.०० | २.६४ |
| ७६ | १ | ०.०८.४० | ०.४४ |
| १०३ | १ | ०.८८.२० | १४.८१ |
| १०४ | ३ | ०.०८.०० | १.०० |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ११/०८/२०२६

**ॲड. सचिन संजय सुर्वे**
बी.कॉम.एल.एल.बी.
नाथ सदन, आंबराई रोड कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे विहूर, ता.मुरूड, जि.रायगड येथील खालील वर्णनाचे मिळकत मिळकतीचे विद्यमान यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| विहूर ता.मुरुड | ११७ | जिरायत ०-२३-३०<br>वरकस ०-०६-००<br>पो.ख. क्षेत्र ०-००-५०<br>एकुण क्षेत्र ०-२९-८० | ३.१२ |

वर वर्णन जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक संदिप सुरीन्दर मित्तल, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक : १०/०८/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं.७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१



जा.क्र.१४७८/२०२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
मालमत्ता क्रमांक ६२५ मारुती मंदिराजवळ,
**चौकशीची जाहीर नोटीस,** पो.चेंढरे, अलिबाग जि. रायगड
दि.१०/०८/२०२६
अर्ज क्रमांक-८३/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक: ''श्री. सिद्धिविनायक मंदिर''
मु. रहाटले, धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड...... बाबत
श्री. जगन्नाथ गंगाराम पाटील,
मु. रहाटले, पो.धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेला नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम २९ सन १९५० कलम १८ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | वस्तूंचे नांव | नग | दर | अंदाजे किंमत रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीची मुर्ती (संगमरवर) | १ | | ५०००० |
| २ | महिरप आणि छत्र (चांदी) | १ | | ५००००० |
| ३ | घंटा (पितळ) | ३ | २५०० | ७५०० |
| ४ | समई मोठी (पितळ) | २ | १००० | २००० |
| ५ | दानपेटी (स्टील) | १ | | ६००० |
| ६ | दानपेटी (लाकडी) | १ | | १००० |
| ७ | उंदीरमामा (पितळ) | १ | | १००० |
| ८ | पूजेसाठी छोटी मूर्ती (पितळ) | १ | | १२०० |
| ९ | पुजेसाठी ताट (चांदी) | ४ | | १००० |
| १० | पुजेची भांडी (ताम्हण, पळीपात्र, तांब्या, अभिषेकपात्र) (तांबा) | ४ | | १००० |
| ११ | पालखी (सागवानी लाकडी) | १ | | ५००० |
| १२ | कळस (पितळ) | १ | | ५,००० |
| | **एकूण किंमत** | | | ७,२४,१०० |

अ) जंगम मिळकत
स्थावर मिळकत (वर्णन)
अ.मौजे सासवने, ता.अलिबाग, जि.रायगड येथील ग्रुप ग्रामपंचायत, सासवने यांचे मिळकत नं. ७१९ असलेले '' श्री. सिद्धिविनायक मंदिर''
क्षेत्रफळ :- ७०.२६ चौ.मी
एकूण ७०.२६ चौ. मी

**चतुर्सिमा :**
१. पूर्वेस :- रस्ता
२.पश्चिमेस :- रस्ता
३.दक्षिणेस :- श्री. पंकज मेहरा यांचे घर
४.उत्तरेस :- भगवान हाशा म्हात्रे यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कर्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मी सहाय्यक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्यानिशी आज दिनांक -१०/०८/२०२६ रोजी दिली.

सही/-
**(अधिक्षक)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गावाचे नाव | गट/ स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १)श्री.योगेश सरदारमल राठोड. | आतोणे | ४८६ | १-१४-०० | ०-३९ |
| २)श्री.राजेश सरदारमल राठोड. | आतोणे | ५१०/१ | २-०२-८४ | ०-०७ |
| ३)श्री.राजेश सरदारमल राठोड. | दिघेवाडी | १८७ | १-२३-८० | ०-९१ |
| ३)सौ.जयश्री राजेश राठोड. | गोमाशी | ५९६ | ०-८३-०० | ०-३७ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
दिनांक :- ११/०८/२०२६

खरेदीदारांतर्फे,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६अ राठोड सदन ऑफिस नं.७ पाली,
ता.सुधागड, जि.रायगड.
मो.९०२८६३५३३७/९२७०३६७२९०

# कार्लेखिंड ते सारळ पूलाचे काम निकृष्ट

- नव्या कोऱ्या रस्त्यावर पडल्या भेगा
- एमएसआयडीसी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष





| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील कार्लेखिंड ते सारळपूल मार्गाच्या सुरू असलेल्या रस्ते कामाबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, या कामांच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहेत. या रस्त्याचे अवघे २५ टक्क्यांपेक्षाही कमी काम पूर्ण झाले असताना नव्याने बांधलेल्या मार्गावर ठीकठिकाणी भेगा पडू लागल्याचे दिसून येत आहे. तसेच, या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले असून, वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. मात्र, याबाबींकडे एमएसआयडीसी अधिकारी कानाडोळा करीत असल्याने नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे.

कार्लेखिंड ते सारळपूल, सारळपूल ते अलिबाग बायपास व कार्लेखिंड ते वायशेत दरम्यान नवीन सिमेंट कॉंक्रिट मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामांसाठी १८८ कोटी रुपये निधी खर्च करण्यात येणार आहेत. एमएसआयडीसीच्या देखरेखीखाली हे काम सुरु आहे.

### नागरिकांच्या जीवितास धोका

सारळपूल ते कार्लेखिंड दरम्यान रस्त्याचे काम सुरू असून, ठेकेदाराने मार्गावर मजबुतीकरणासाठी केमिकल मिक्स सिमेंट पावडर पसरवून ठेवली आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांचे वाहन घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. दररोज सरासरी चार ते पाच दुचाकीस्वार घसरुन पडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेषतः पावसाळ्यात ही पावडर अधिक धोकादायक ठरत असून, वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

मात्र, कार्लेखिंड ते सारळपूल मार्गाच्या सुरू असलेल्या कामाच्या गुणवत्तेवर नागरिकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. सद्यस्थितीत या मार्गावर २५ टक्क्यांपेक्षा कमी काम पूर्ण झाले असताना नव्याने बांधलेल्या मार्गावर ठीकठिकाणी भेगा पडू लागल्या आहेत. रस्त्याचे काम पूर्ण केल्याच्या ठिकाणी साईटपट्टी टाकण्यात आलेली नाही. याशिवाय भर पावसातच रस्त्याचे काम सुरू असल्याने कामाच्या गुणवत्तेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. पावसाच्या पाण्यामुळे बांधकाम साहित्याच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

> “कार्लेखिंड ते सारळपूल मार्गाचे काम सुरू आहे. या कामांची वारंवार तपासणी करण्यात येत आहे. अपघातांचे प्रमाण रोखण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. जर मार्गावर कुठे भेगा पडल्या असतील तर त्या दुरुस्त करून घेण्यात येतील.
> – बी.के. सिंग, निवासी अभियंता, एमएसआयडीसी”

> “कार्लेखिंड-सारळपूल मार्गावर काही दिवसांतच भेगा पडू लागल्या आहेत. तसेच, या मार्गावर सुरक्षा उपाययोजनांचाही अभाव आहे. मार्गावर पसरलेल्या केमिकल मिक्स सिमेंट पावडरमुळे वाहने घसरून अपघात होत आहेत. या कामाच्या दर्जाची अधिकाऱ्यांनी पहाणी करावी.
> – स्थानिक ग्रामस्थ”

या सर्व पार्श्वभूमीवर रस्त्याच्या कामाची उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करून गुणवत्ता तपासावी, कामात त्रुटी आढळल्यास संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करावी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने योग्य उपाययोजना कराव्यात, अशा मागण्यांसह कामाच्या दर्जाबाबत नागरिकांमध्ये असंतोष पसरत असून, ग्रामस्थ आंदोलन उभारण्याच्या तयारीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## निवडक



### पनवेलमध्ये गणेशोत्सवाची जय्यत तयारी

**खांदा कॉलनी :** यंदाचा श्री गणेशोत्सव दि.१४ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात साजरा होणार असून, पनवेल शहरात सध्या उत्सवाची लगबग सुरू झाली आहे. पनवेल परिसरातील विविध सार्वजनिक गणेश मंडळेही उत्सवाच्या तयारीला लागली असून, सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. त्याचबरोबर मूर्तिकारांची देखील विविध आकारांच्या मूर्ती घडविण्यासाठी लगबग सुरू आहे. यंदा पनवेलच्या गुजराथी शाळेच्या मैदानावर भव्य जय महाकाल मंदिर उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी १०० बाय ६६ फूट आकाराचा भव्य मंडप उभा राहणार असून, त्याचे काम वेगाने सुरू आहे. मंडप उभारणीसाठी लागणारे कारागीर व कामगारही सज्ज झाले असून, प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. मंडपातील अंतर्गत सजावट व रचना यासाठी विशेष नियोजन करण्यात येत आहे. उत्सव काळात भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन आवश्यक सुविधा उभारण्यावर भर दिला जात आहे. सुरक्षा व्यवस्था, प्रकाशयोजना आणि प्रवेश व्यवस्थेचेही नियोजन अंतिम टप्प्यात आहे. या संपूर्ण कामाची पाहणी मंडळाचे अध्यक्ष कांतीलाल कडू स्वतः करत आहेत. कडू यांनी मंडप परिसराची पाहणी करून कामाचा आढावा घेतला. काम वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेलमध्ये धार्मिक उत्साह अधिकच वाढताना दिसत आहे. भव्य जय महाकाल मंदिर आणि मंडपामुळे यंदाचा उत्सव विशेष आकर्षण ठरणार आहे.



### नेरळमधील दोन कोटींचा पुल खड्ड्यात

**नेरळ :** येथील कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर असलेला लहान पूल जून २०२५ मध्ये वाहतुकीस बंद करण्यात आला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलाच्या कामासाठी दोन कोटींचा निधी मंजूर केला होता. त्या निधीमधून बांधण्यात आलेल्या पुलावरून दि.४ ऑगस्ट रोजी वाहतूक सुरु करण्यात आली. मात्र, या पुलावर दोन्ही बाजूला टाकण्यात आलेली खडी दबून गेली असून, खड्डे पडले आहेत. त्यामुळे दोन कोटी खर्चून बांधलेल्या पुलाचे काम तकलादू असल्याचे बोलले जात आहे. नेरळ येथील मोहाची वाडी आणि वाल्मिकी नगर समोरील लहान पूल नादुरुस्त झाल्याने जून २०२५ पासून वाहतुकीस बंद करण्यात आला होता. त्या ठिकाणी नवीन पुलाचे काम मंजूर होण्यास चार महिन्यांचा कालावधी लागला. त्यानंतर नोव्हेंबर २०२५ मध्ये पुलाच्या कामाला सुरुवात करण्यासाठी जुना पूल तोडून दोन महिने कोणतेही काम बांधकाम विभागाने नेमलेला ठेकेदार करीत नव्हता.त्यावेळी जनमताचा रेटा प्रचंड वाढला आणि त्यावेळी ठेकेदाराने पुलाच्या कामाला सुरुवात केली. त्यानंतर हा पूल ऑगस्ट पहिल्या आठवड्यात खुला केला, परंतु, ठेकेदाराची सार्वजनिक बांधकाम खात्यावर असलेली लॉबिंग यामुळे दोन कोटी खर्चून बांधलेला पूल अवघ्या आठ दिवसाच्या आत खड्डेमय बनला आहे. स्थानिक आमदारांनी पुलाची पाहणी करावी आणि सार्वजनिक बांधकाम खात्याच्या चौकशीची मागणी करावी, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

### जलवाहिन्यांची गळती थांबेना

**श्रीवर्धन :** शहराला रानवली येथील पाझर तलवामधून पाणीपुरवठा करण्यात येतो. दोन वर्षांपूर्वी या पाझर तलावाजवळ नव्याने जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला असून, जलशुद्धीकरण प्रकल्पापासून ते साठवण टाकीपर्यंत जलवाहिन्या देखील नव्याने टाकण्यात आल्या आहेत. परंतु, हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे जलवाहिन्या वारंवार फुटत आहेत. रानवली ते साठवण टाकी यामधील जलवाहिन्या वारंवार फुटत असल्यामुळे पाझर तलावातील पाण्याची पातळी कमी होते. यावर्षी मे महिन्याच्या पंधरा तारखेनंतरच श्रीवर्धन शहरात पाणीटंचाई सुरू झाली. जलवाहिन्या वारंवार फुटत असल्यामुळे पाण्याची गळती होऊन लाखो लिटर पाणी वाया जात आहे. त्याचबरोबर श्रीवर्धन शहरात ज्या नागरिकांच्या घरांमध्ये नळ जोडणी दिलेली आहे त्या नळ जोडणीच्या ठिकाणी देखील अनेक वेळा पाईप लीक झालेले आढळुन येतात. त्यामुळे देखील खूप मोठ्या प्रमाणात पाणी गळती होते. या जलशुद्धीकरण प्रकल्प व जलवाहिन्या बदलण्याचे काम कोल्हापूर येथील रविराज इन्फ्रास्ट्रक्चर्स या कंपनीने केले आहे. ठेकेदार काम करून बिल घेऊन निघून देखील गेला आहे. मात्र, मनस्ताप श्रीवर्धनच्या नागरिकांना सहन करावा लागत आहे. यावर्षी पावसाचे प्रमाण देखील अत्यल्प आहे. रानवली पाझर तलाव अद्याप पर्यंत पूर्ण भरलेला नाही. त्यातच जलवाहिन्या पाच ते सहा ठिकाणी छोट्या स्वरूपात फुटलेल्या असल्यामुळे पाणी वाया जात आहे.

## स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर
# दोरीवरची कसरत



**राजेश डांगळे**
| पनवेल |

पनवेल शहरातील बापट वाड्यासमोर एका चिमुकलीने तिरंगा हातात घेऊन चक्क उंच दोरीवर उभे राहून कसरत केल्याचे दृश्य कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर हातात डौलाने फडकणारा तिरंगा आणि दुसरीकडे धोकादायक परिस्थितीत सुरू असलेली ही कसरत लक्ष वेधून घेत आहे.

पनवेलमधील बापट वाड्यासमोरच्या परिसरात रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात बांधकामाचा राडारोडा पडलेला दिसत असून, त्याच ठिकाणी लोखंडी खांबांच्या आधारे दोरी बांधण्यात आली आहे. या दोरीवर चिमुकली कसरत करताना दिसत असून, तिच्या हातात तिरंगा आहे. खाली राडारोडा आणि बाजूला सुरू असलेली वाहतूक पाहता तोल गेल्यास गंभीर दुर्घटना होण्याची शक्यता आहे. त्यामुळे देशभक्तीचा उत्साह कौतुकास्पद असला तरी चिमुकल्यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होऊ नये, अशी भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. अशा प्रकारच्या कसरतींसाठी सुरक्षित जागा आणि आवश्यक खबरदारी घेणे गरजेचे आहे. संबंधित यंत्रणांनी परिसराची पाहणी करून नागरिकांच्या तसेच लहान मुलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

### अरूण कुमार वैद्य यांचे पुण्यस्मरण



| अलिबाग | प्रतिनिधी |

प्रभाकर पाटील सांस्कृतिक मंचातर्फे अलिबागमधील प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालयात सोमवारी (दि.१०) जनरल अरुणकुमार वैद्य यांच्या प्रतिमेला मंचाचे सर्वोसर्वो ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त नागेश कुळकर्णी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच, त्यांच्या अनेक आठवणींना उपस्थित मान्यवरांनी उजाळा दिला. यावेळी लेखक शरद कोरडे, ज्येष्ठ नागरिक संघाच्या उपाध्यक्षा चारुशीला कोरडे, अलिबाग ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव तसेच कोमसापचे जिल्हा प्रतिनिधी नंदू तळकर, माजी नगरसेवक आर. के. घरत, पोलीस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष विकास पाटील, ॲड. राजेंद्र जैन, प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालयाच्या ग्रंथपाल ज्योती म्हात्रे, झेबा कुरेशी तसेच वाचनालयातील वाचक वर्ग उपस्थित होते.

### ट्रेलरची चारचाकीला धडक

- चालकाविरोधात गुन्हा दाखल

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहर परिसरात भरधाव व निष्काळजीपणे ट्रेलर चालवत चारचाकी वाहनाला धडक दिल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी कृष्णमूर्ती पोटीरस्वामी (४५) यांनी माहिती दिली आहे. त्यानुसार श्री मातोश्री ट्रान्सपोर्ट प्रा.लि. कंपनीच्या ट्रेलर वरील चालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पनवेल पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जेडब्ल्यूआर कंपनीसमोर पनवेलकडे जाणाऱ्या रस्त्यावर हा अपघात झाला. ट्रेलर चालकाने सार्वजनिक रस्त्यावर बेदरकारपणे व निष्काळजीपणे वाहन चालवत फिर्यादीच्या ऑक्टोव्हर या वाहनाला धडक दिली. या धडकेत वाहनाचे नुकसान झाले. अपघातानंतर ट्रेलर चालक घटनास्थळावरून निघून गेल्याची तक्रार पोलिसांकडे करण्यात आली. त्यानुसार संबंधित चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित बिरादार हे करीत आहेत.

### इडली-डोसा विक्रेत्यावर गुन्हा

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहर पोलिसांनी विनापरवाना गॅस सिलिंडरच्या साहाय्याने इडली-डोसा विक्री करणाऱ्या एका विक्रेत्यावर कारवाई केली आहे. बाबुल साहू (२८) असे विक्रेत्याचे नाव असून, त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. करंजाडे परिसरात बाबुल साहू हा सार्वजनिक ठिकाणी गॅस सिलिंडरच्या साहाय्याने इडली-डोसा विक्री करताना आढळून आला. त्यामुळे मानवी जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी तत्काळ कारवाई केली.

### अलिबागमध्ये अरुणकुमार वैद्य यांच्या स्मारकासाठी प्रयत्नशील

**जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे प्रतिपादन**



| अलिबाग | प्रतिनिधी |

भारताचे माजी लष्करप्रमुख आणि अलिबागचे सुपुत्र जनरल अरुणकुमार वैद्य यांचे अलिबाग येथे स्मारक उभारण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले. तसेच, त्यांचा १० ऑगस्ट हा स्मृतिदिन अलिबाग येथे शासकीय इतमामात साजरा करण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. माजी लष्करप्रमुख जनरल अरुणकुमार वैद्य यांचा स्मृतिदिन अलिबाग येथील शिशुविहार प्राथमिक शाळेत साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी जावळे बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, बळवंत वालेकर, आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांच्यासह ॲड. प्रसाद पाटील, सुकुमार भगत, पी.जी. गोखले, विलास तांडेल, देवदत्त जोगळेकर, विनोद टेंबुलकर, राजाराम भगत, चंद्रकांत वालेकर, देवळेकर, महेंद्र ठाकूर, संतोष तावडे, राजेंद्र म्हात्रे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

### रस्त्यावर ट्रेलर उभा

| पनवेल | प्रतिनिधी |

सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा धोकादायक पद्धतीने ट्रेलर उभा केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. प्रदीप सहानी (४८) असे या चालकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पनवेल येथील जेएनपीटी महामार्गावरील रस्त्यावर प्रदिप सहानी याने मॉन्स्टर ट्रेलर सार्वजनिक रस्त्यावर धोकादायक स्थितीत उभा करून ठेवला होता. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघाताचा धोका निर्माण झाला होता.

### तक्का परिसरात वीज डीपी धोकादायक अवस्थेत

- नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

पनवेलमधील तक्का परिसरात वीज वितरण विभागाच्या डीपीची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली आहे. डीपीच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणावर माती आणि चिखल साचला असून, डीपी मागील बाजूस झुकल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या ठिकाणी सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पावसामुळे परिसरातील माती चिखलमय झाली असून, डीपीच्या सभोवतालची परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. वीज वितरणाची महत्त्वाची यंत्रणा अशा अवस्थेत असतानाही संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याची नाराजी नागरिकांकडून व्यक्त होत आहे. दुसरीकडे, डीपीच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर माती व चिखल साचलेला असताना पालिका प्रशासनाकडूनही या भागाची स्वच्छता कधी केली जाणार, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. पावसाळ्यात अशा विद्युत यंत्रणेच्या परिसरात चिखल व पाणी साचल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. डीपी झुकलेल्या अवस्थेत असल्याने संबंधित वीज वितरण विभागाने तातडीने पाहणी करून आवश्यक ती दुरुस्ती करावी, तसेच पालिकेने डीपी परिसरातील चिखल-माती हटवून स्वच्छता करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. एखादी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासन आणि वीज वितरण विभागाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### पनवेलमध्ये अनोळखी व्यक्तिचा मृत्यू

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहरात एका अनोळखी व्यक्तिचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या मृत व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नसून, त्याच्याबाबत माहिती असलेल्या नागरिकांनी पनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवहन करण्यात आले आहे. याव्यक्तिला उपचारासाठी पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या व्यक्तिचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून रंग गोरा, उंची सुमारे ५ फूट ४ इंच अशी आहे. त्याच्या चेहऱ्यावर काळ्या रंगाची दाढी-मिशी आहे.

**पुनर्वसनाचा प्रश्न ४० वर्षांपासून प्रलंबित | जेएनपीए प्रशासन भवनासमोर करणार उपोषण**

### हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांचा एल्गार



| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा (शेवा कोळीवाडा) व नवीन शेवे या गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न तब्बल ४० वर्षांपासून प्रलंबित असल्याने ग्रामस्थांचा संताप आता उफाळून आला आहे. जेएनपीए प्रकल्पासाठी स्थानिकांनी जमीन, घरे देऊन आणि पारंपरिक उपजीविकेवर परिणाम सहन करूनही पुनर्वसनाचा प्रश्न अद्याप पूर्णत्वास न गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी आंदोलनाची घोषणा केली आहे.

नवीन शेवा व हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांच्यावतीने रविवारी (दि.९) नवीन शेवा येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीत अनेक महत्त्वाची निर्णय घेण्यात आले. यावेळी माजी आमदार मनोहर भोईर, पंचायत समिती सदस्य दिपक भोईर, सरपंच सोनल घरत, कमळाकर पाटील, लक्ष्मण म्हात्रे, चंद्रकांत घरत, कृष्णा घरत, बाळकृष्ण पाटील, शैलेश भोईर, पंडित घरत, कमळाकर घरत, गणेश म्हात्रे, सुरेश कोळी, नितीन कोळी, परमानंद कोळी, हरेश कोळी, हेमंत म्हात्रे, एकनाथ घरत यांच्यासह सर्व पक्षीय नेते, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

या बैठकीत पुनर्वसनाच्या प्रक्रियेत गेल्या ४० वर्षांपासून अन्याय व फसवणूक होत असल्याचा आरोप ग्रामस्थ व विस्थापितांमार्फत करण्यात आला आहे. यावेळी ग्रामस्थांच्या तीन प्रमुख मागण्या उपोषणाच्या केंद्रस्थानी आहेत. बनावट व चुकीची २ आज्ञापत्रे रद्द करा, तसेच त्या आज्ञापत्राने दिशाभूल करणाऱ्या कारभाराबाबत संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी, अशी पहिली मागणी आहे. दुसरी विस्थापितांची फसवणूक केल्याच्या आरोपांची चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर १५ दिवसांत कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तर सर्वांत महत्त्वाची मागणी म्हणजे नवीन शेवा आणि शेवा कोळीवाडा गावांचे न्याय्य व पूर्ण पुनर्वसन तातडीने करावे, अशा तीन मागण्या करण्यात आले. त्यासाठी दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८.०० वाजता जेएनपीए प्रशासन भवनासमोर उपोषण करण्यात येणार आहे.

### जवान दिनेश सावंत यांची सेवापूर्ती

**३० वर्षांच्या खडतर सेवेनंतर निवृत्त**



| श्रीवर्धन | संदेश घोलप |

भारतीय सैन्याच्या प्रतिष्ठित ‘१७ मराठा लाईट इन्फंट्री’च्या माध्यमातून तब्बल ३० वर्षे अहोरात्र देशसेवा बजावून श्रीवर्धन तालुक्यातील वाकलघर गावचे सुपुत्र दिनेश रामचंद्र सावंत हे दि.३१ जुलै रोजी सैन्यदलातून सन्मानाने सेवामुक्त झाले. त्यांच्या या प्रदीर्घ व निष्ठावंत सेवापूर्तीचे औचित्य साधून रविवारी (दि.४) डोंबिवली शहरात त्यांच्या नागरी सत्काराचा भव्य सोहळा अत्यंत उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात पार पडला.

जवान दिनेश सावंत यांनी सन १९९६ मध्ये भारतीय सेनेमध्ये प्रवेश केला होता. गेल्या तीन दशकांत देशाच्या विविध सीमांवर, खडतर हवामानात आणि आव्हानात्मक परिस्थितीमध्ये त्यांनी आपले कर्तव्य बजावले. ३० वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ते सेवानिवृत्त झाल्याने केवळ त्यांचे मूळ गाव वाकलघरच नव्हे, तर संपूर्ण श्रीवर्धन तालुका आणि रायगड जिल्ह्याची मान अभिमानाने उंचावली आहे. सेवापूर्तीनिमित्त डोंबिवली शहरातून दिनेश सावंत यांची सुशोभित वाहनातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी “भारत माता की जय” आणि “छत्रपती शिवाजी महाराज” यांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी फुलांची उधळण आणि वाद्यांच्या गजरात नागरिकांनी आणि माजी सैनिकांनी या वीर जवानाचे स्वागत केले.

# तिसरा घास आणि फास

तिसऱ्या मुंबईच्या प्रकल्पाचा आराखडा सात महिन्यात तयार होईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच जाहीर केले. सिंगापूरमधील सुरबाना जुरोंग या कंपनीला आराखडा बनवण्याचे कंत्राट देण्यात आले आहे. हा आराखडा तयार करण्यासाठी ३५ कोटी रुपये खर्ची पडणार आहेत. मुख्य बेटांवर जागा कमी पडू लागल्याने गेल्या कित्येक दशकांपासून दक्षिणेला रायगड आणि उत्तरेला ठाणे व पालघर यांच्या जागांवर मुंबईचा डोळा आहे व त्याचे भक्षण चालू आहे. हा नवा प्रकल्प म्हणजे रायगड जिल्ह्यातल्या जागांचा आणखी एक घास आहे आणि या भागातील अनेकांच्या दृष्टीने तो फास ठरणार आहे. याची तयारी गेल्या अनेक वर्षांपासून चालू आहे. ऑक्टोबर २०२४ ला याबाबत अधिसूचना जारी करण्यात आली. १२४ गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार हे नक्की झाले. पण त्यानंतर पुढे जे झाले त्यावरून अगदी पहिल्यांदा नवी मुंबईसाठी उरणचा घास घेताना जे घडले त्यावेळच्या वृत्तीत आणि आता काहीही फरक पडलेला नाही हे स्पष्ट झाले. सरकारच्या २०२४ मधील अधिसूचनेवर या भागातील लोकांनी सुमारे १७ हजार ७७१ हरकती दाखल केल्या आहेत. पण सरकारने त्यांची दखल घेतलेली नाही. भूसंपादन, त्याची भरपाई आणि रस्ते वगैरेंचा विकास या संदर्भात जनतेचे हे आक्षेप आहेत. पण कोकण विभागीय आयुक्तांकडील माहितीनुसार एमएमआरडीएने १७ हजारांपैकी केवळ ४२ तक्रारी नगरविकास खात्यापर्यंत पोचवल्या आहेत. विकासाचे नाव घेताना फडणवीस आणि शिंद्यांचे हे सरकार जनतेला किती तुच्छ मानते हे यावरून दिसून यावे. राजकारण्यांना निदान पुन्हा निवडून यायचे असल्याने खोटा कळवळा दाखवावा लागतो. अधिकाऱ्यांना तर त्याचीही गरज नसते. राजकारण्यांचे बूट चाटून त्यांना खूष ठेवले की इकडे जनतेशी कशाही मुजोरपणे वागायला हे मोकळे असतात. या प्रकल्पासंदर्भात आणि त्यावरील आक्षेपांसंदर्भात जनसुनावणी घ्यावी अशी लोकांची मागणी आहे. पण एमएमआरडीएने ती मान्य केलेली नाही. याबाबत एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी यांना विचारले असता त्यांनी अशा जनसुनावणीची गरजच उडवून लावली आहे.

## इंगा दाखवण्याची वेळ

लोकांकडून लेखी हरकती घेतल्या गेल्या व त्यांना योग्य ती उत्तरे दिली गेली आहेत. त्यामुळे आता जनसुनावणीची गरज नाही असे मुखर्जी यांनी म्हटल्याचे वृत्त हिंदू या दैनिकाने दिले आहे. असे असेल तर अधिकारी किती उद्दाम झाले आहेत व त्यांनी सर्व कायदे व नियमांना कसे धाब्यावर बसवले आहे हे लक्षात यावे. अशा प्रकल्पांमध्ये लेखी हरकती येतच असतात. पण लोकांना विश्वासात घेण्यासाठी तसेच त्यांचे शंका समाधान करण्यासाठी जाहीर सुनावणी घेणे हे कायद्याने बंधनकारक आहे. अनेकदा लेखी हरकतींवर सरकारी अधिकारी ठोकळेबाज उत्तरे देतात. त्यावर प्रतिप्रश्न व उपप्रश्न करायचे झाले तर पुन्हा पत्रव्यवहार करावा लागतो. सामान्य लोकांसाठी हा जिकिरीचा व खर्चाचा भाग असतो. शिवाय सध्याचे सरकार राजकीय पार्टी आणि संघटनांनाही दाद देत नाही तिथे ते साध्या माणसांची काय पत्रास ठेवणार हे दिसतेच आहे. एकूण सरकारचे प्रकल्प रेटून नेणे आणि अधिकाऱ्यांची ही उद्दामशाही मोडून काढण्यासाठी आता रायगड जिल्ह्यातील जनतेला आपला इंगा दाखवावा लागणार आहे. अन्यथा जिथे त्यांच्या पिढ्या न पिढ्या गेल्या त्याच त्यांच्या गावांमधून व जमिनींमधून त्यांना विस्थापिताचे जिणे जगावे लागणार आहे. कर्नाळा, साई, चिरनेर अशा वीस किलोमीटरच्या त्रिज्येच्या परिसरात आणि ३२३ चौरस किलोमीटरवर हे नवनगर वसवले जाणार असून त्यासाठी चार हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हा बराचसा भाग शेतीखाली आहे. आंदोलकांच्या म्हणण्यानुसार पेण तालुक्यातील ४२ गावे तर सिंचन योजनेखालची असून त्यासाठी सरकारने ७६७ कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. एकीकडे पाटबंधारे व सिंचनासाठी खर्चाची कंत्राटे द्यायची, त्याखाली अमुक इतकी शेतजमीन भिजेल असे दाखवायचे आणि दुसरीकडे तीच शेतजमीन असल्या तिसऱ्या मुंबईच्या गोंडस नावाखाली बिल्डरांच्या घशात घालायची हा सरकारचा मनमानी व उफराटा कारभार चालू आहे. बिल्डर थेट जमिनी मागायला आले तर लोकांचा विरोध होईल हे लक्षात घेऊन प्रकल्पाच्या नावाखाली त्यांचे भूसंपादन करायचे हा भारतभर चाललेला खेळ इथेही खेळला जात आहे.

## पुन्हा चिरनेर सत्याग्रह होईल

भूसंपादन कायद्यानुसार, धरणे, वीजनिर्मिती इत्यादी लोकोपयोगी प्रकल्पांसाठी जमिनी सक्तीने घेता येतात हे खरे आहे. त्यासाठी एरवीच्या कित्येक पट मोबदला मिळण्याची तरतूद मनमोहनसिंगांच्या काळात २०१३ मध्ये करण्यात आली. तोच कायदा इथेही लागू असून लोकांना भरपाईचे सर्व मार्ग उपलब्ध आहेत असे एमएमआरडीएवाले सांगतात. या मार्गांमध्ये सरकारी नोकरी, जागेतील मालकी हिस्सा काही प्रमाणात कायम ठेवणे असेही पर्याय आहेत. पण ते खरोखरच शेतकऱ्यांच्या वाट्याला येणार आहेत काय की त्यासाठी पुन्हा आंदोलने करावी लागणार आहेत हा खरा सवाल आहे. नवी मुंबईसाठी १९७० च्या दशकात सिडकोने ९५ गावांमधून भूसंपादन केले. पण त्या अन्याय्य भूसंपादनाला विरोध करण्यासाठी दि.बा. पाटील यांना उग्र आंदोलन करावे लागले. पुढे १९९० च्या दशकात अंबानीसाठी महामुंबई नावाच्या प्रकल्पाचा घाट घालण्यात आला. त्यावेळी २२ गावांच्या जोरदार विरोधामुळे तो प्रकल्प गुंडाळण्यात आला तरी त्यासाठी घेतलेल्या जमिनीचा पूर्ण हिशेब झालेला नाही. यातील बरीच जमीन अंबानीकडेच आहे असे म्हणतात. एका अर्थाने, तेव्हा बारगळलेला महामुंबई प्रकल्प नव्या नावाने पुन्हा दाखल झालेला आहे. २०११ मध्ये सिडकोची आणखी एक टोळधाड आली. नवी मुंबई विमानतळासाठी दहा गावातील जवळपास २८०० एकर जमीन संपादन करण्यात आली. मात्र स्थानिकांना रोजगार देण्याबाबतचे प्रश्न सुटलेले नाहीत. सरकारकडे राक्षसी प्रचारयंत्रणा आहे. जनतेचा कोट्यवधींचा पैसा आहे. त्यांच्या आधारे हे सरकार विकासाच्या नावाखाली लोकांना चिरडून टाकणारे हे रणगाडे इकडे तिकडे फिरवत असते. भूसंपादन कायद्यात जनतेच्या बाजूच्या बऱ्याच तरतुदी असल्या तरी प्रशासन व सरकार लोकांना विश्वासात घेणार नसेल तर त्याला अर्थ राहत नाही. जनसुनावणी म्हणजे निव्वळ पार पाडायचा उपचार असे म्हणून सरकार त्याकडे पाहते. अन्यथा, फडणवीसांचा ताजी घोषणा झालीच नसती. जनतेच्या आक्षेपांबाबत विचार न करताच आता सिंगापूरच्या कंपनीला आराखड्याचे कंत्राट दिले गेले आहे. इथून पुढे अदानीपासून सर्व सरकारी मित्र बिल्डर या योजनेवर तुटून पडतील. हा आराखडा त्यांच्या सोईनेच बनवला जाईल. जनतेला त्यासाठी चर्चेला बोलावणे तर लांबच राहिले, त्याचा मसुदा तिच्या दृष्टीसही पडू दिला जाणार नाही. या जुलुमशाहीला विरोध करावाच लागेल. १९३० साली ब्रिटिशांच्या सत्तेविरोधात याच परिसरातील चिरनेरमध्ये अतिशय उग्र असा जंगल सत्याग्रह करण्यात आला होता. त्यात आठ जण हुतात्मे झाले होते. आता ९५ वर्षांनी पुन्हा एकवार याच भागावर स्वतंत्र भारतातील आपल्या म्हणवणाऱ्या सरकारचा विकास वरवंटा फिरू पाहतो आहे. त्याला जबाब द्यावा लागेलच.

# विचार

# ...तरच आंदोलनाची फलश्रुती यशात होईल

*विद्यार्थी चळवळीचे भविष्य संख्येवर नव्हे, तर विचारांवर ठरणार आहे. घोषणांचा आवाज घुमतो; परंतु समाज दूरदृष्टी, शिस्त, अभ्यास आणि नैतिकतेच्या बळावर बदलतो. उद्याचा अधिक न्याय्य, विश्वासार्ह भारत घडवणाऱ्या जबाबदार युवकांकडून देशाला अपेक्षा आहे. काही तरुण-तरुणींच्या हिडीस, ओंगळ घोषणा, पोस्टर्स यापलिकडे जाऊन ऐतिहासिक संधी ओळखली, तर लोकशाहीतील नव्या विद्यार्थी युगाची सुरुवात होईल.*

**प्रा. गोरख सांगळे**

देशातील 'नीट' परीक्षेभोवती निर्माण झालेल्या वादाने केवळ एका परीक्षेच्या विश्वासार्हतेचा प्रश्न उपस्थित केलेला नाही, तर देशातील तरुणाईच्या मनात वर्षानुवर्षे साचत गेलेल्या अस्वस्थतेलाही एक मुखर व्यासपीठ मिळवून दिले. लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित असलेल्या या परीक्षेतील कथित गैरव्यवहार, प्रश्नपत्रिका गळती, व्यवस्थेतील त्रुटी आणि त्यातून निर्माण झालेला संताप अखेर देशव्यापी आंदोलनात परिवर्तीत झाला. या आंदोलनाच्या दबावाखाली केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पदाचा राजीनामा दिला, ही या आंदोलनाची मोठी राजकीय आणि नैतिक उपलब्धी मानली जात आहे. लोकशाही व्यवस्थेत जनदबावामुळे एखाद्या जबाबदार मंत्र्याला पदत्याग करावा लागणे ही घटना महत्त्वाची असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या संघटित शक्तीची जाणीव झाली; परंतु कोणतेही आंदोलन केवळ एका मागणीच्या पूर्ततेवर संपत नसते. उलट त्यानंतरच त्याच्या खऱ्या प्रवासाची सुरुवात होत असते. त्यामुळे आज सर्वात मोठा प्रश्न हा आहे, की 'नीट' आंदोलनाचे पुढे काय होणार? ते विद्यार्थ्यांच्या प्रश्नांपुरते मर्यादित राहणार, की देशातील युवकांच्या व्यापक प्रश्नांचे प्रतिनिधित्व करणारे राष्ट्रीय आंदोलन म्हणून विकसित होणार? त्याला वैचारिक दिशा मिळणार का की ते इतर अनेक आंदोलनांप्रमाणे काही दिवसांच्या भावनिक उद्रेकानंतर विरून जाणार? या आंदोलनाने एक महत्त्वाची गोष्ट स्पष्ट केली. देशातील युवक आता केवळ 'सोशल मीडिया'वर नाराजी व्यक्त करणारा वर्ग राहिलेला नाही. आवश्यक वाटल्यास तो रस्त्यावर उतरू शकतो, संघटित होऊ शकतो आणि शासनावर दबाव निर्माण करू शकतो.

गेल्या काही वर्षांमध्ये रोजगार, भरती प्रक्रिया, स्पर्धा परीक्षा, प्रश्नपत्रिका गळती, निकालातील विलंब, प्रवेशप्रक्रिया, शिष्यवृत्ती आणि शिक्षणाचा वाढता खर्च अशा अनेक प्रश्नांवर विविध राज्यांमध्ये आंदोलने झाली; परंतु ती बहुतेक वेळा स्थानिक स्वरूपाची राहिली. 'नीट'च्या निमित्ताने मात्र देशभरातील विद्यार्थी एका समान प्रश्नाभोवती एकत्र आले. ही बाब भारतीय विद्यार्थी चळवळीच्या इतिहासात महत्त्वाची मानावी लागेल. तथापि, या आंदोलनातील काही घटना चिंताजनकही ठरल्या. लोकशाहीतील आंदोलनाला नैतिक अधिष्ठान असणे आवश्यक असते. आंदोलनाच्या काळात काही ठिकाणी वापरण्यात आलेली अर्वाच्च, अश्लाघ्य भाषा, वैयक्तिक टीका, 'सोशल मीडिया'वर पसरवण्यात आलेली द्वेषपूर्ण अभिव्यक्ती आणि काही गटांनी केलेले आक्रमक प्रदर्शन यामुळे आंदोलनाच्या मूळ उद्देशालाच धक्का बसला. विद्यार्थ्यांचे आंदोलन हे समाजासाठी आदर्श असते. त्यात सभ्यता, संयम, तर्क आणि नैतिकतेचा आग्रह अपेक्षित असतो. आंदोलनाची ताकद घोषणांमध्ये नसते, ती त्याच्या नैतिक उंचीत असते. भाषा जितकी सुसंस्कृत, तितके आंदोलन अधिक प्रभावी ठरते. त्यामुळे आंदोलनात शिरलेल्या या हिडीस प्रवृत्तींचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत करता येणार नाही.

इतिहास पाहिला, तर भारतातील अनेक विद्यार्थी आंदोलने केवळ शैक्षणिक प्रश्नांपुरती मर्यादित राहिली नाहीत. स्वातंत्र्यलढ्यातील विद्यार्थी सहभाग, गुजरातमधील नवनिर्माण आंदोलन, बिहारमधील विद्यार्थी आंदोलन, आसाम आंदोलन किंवा भ्रष्टाचाराविरोधातील विविध चळवळी यांमध्ये विद्यार्थ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली; मात्र त्या आंदोलनांना काही वैचारिक चौकट, नेतृत्व आणि सामाजिक उद्दिष्टे होती. आजच्या आंदोलनात ती बाजू तुलनेने कमकुवत दिसते. सध्याच्या विद्यार्थी आंदोलनासमोरचा सर्वात मोठा प्रश्न म्हणजे वैचारिक नेतृत्वाचा अभाव. आंदोलनासाठी उत्साह आहे, संख्या आहे, डिजिटल माध्यमांची ताकद आहे; पण पुढे कोणता समाज घडवायचा, शिक्षणव्यवस्थेत कोणते बदल अपेक्षित आहेत, परीक्षा प्रणाली अधिक पारदर्शक कशी होईल, शिक्षणातील समान संधी कशा निर्माण होतील, विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, रोजगार, संशोधन, सार्वजनिक शिक्षण यांसारख्या प्रश्नांवर व्यापक दृष्टी कोण मांडणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. आजचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर 'सोशल मीडिया'च्या माध्यमातून संघटित होतात. त्यामुळे आंदोलन जलद उभे राहते; पण तेवढ्याच वेगाने विखुरण्याचाही धोका असतो. डिजिटल माध्यमे माहितीचा प्रसार करतात; मात्र विचारांची मांडणी, संघटन उभारणी आणि दीर्घकालीन कार्यक्रम तयार करण्याची प्रक्रिया प्रत्यक्ष संवादातूनच घडते. आंदोलनाला दीर्घकालीन स्वरूप द्यायचे असेल तर केवळ 'हॅशटॅग' पुरेसे ठरणार नाहीत. 'नीट' आंदोलनाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तो केवळ वैद्यकीय प्रवेश परीक्षेपुरता मर्यादित नाही. देशभरातील विविध स्पर्धा परीक्षांमध्ये वारंवार प्रश्नपत्रिका गळती, भरती प्रक्रियेतील विलंब, परीक्षा रद्द होणे, न्यायालयीन वाद, निकालातील अनिश्चितता अशा अनेक समस्या सातत्याने समोर येत आहेत. लाखो तरुणांची अनेक वर्षे या प्रक्रियेत खर्ची पडतात. त्यामुळे 'नीट' आंदोलनाने या सर्व प्रश्नांना एकत्रित व्यासपीठ देण्याची क्षमता आहे. ही ऊर्जा योग्य दिशेने वापरली गेल्यास परीक्षा व्यवस्थेतील मूलभूत सुधारणांसाठी देशव्यापी जनमत तयार होऊ शकते; परंतु त्याच वेळी आंदोलन राजकीय स्पर्धेचे साधन बनण्याचाही धोका आहे. लोकशाहीत प्रत्येक आंदोलनाकडे राजकीय पक्षांचे लक्ष असते. त्यात काही गैर नाही; मात्र आंदोलनाची सूत्रे विद्यार्थ्यांच्या हातून निसटून राजकीय हितसंबंधांच्या हातात गेली, तर मूळ प्रश्न मागे पडतात. विद्यार्थ्यांनी कोणत्याही राजकीय पक्षाशी संवाद ठेवण्यास हरकत नाही; पण स्वतःची वैचारिक स्वायत्तता कायम राखणे अधिक आवश्यक आहे. अन्यथा आंदोलन हे विद्यार्थ्यांचे न राहता इतरांचे राजकीय रणांगण बनते. यापुढील काळात या आंदोलनासमोर काही मूलभूत पर्याय आहेत. पहिला म्हणजे, मागण्या मान्य झाल्यानंतर आंदोलन आपोआप शांत होईल. दुसरा म्हणजे परीक्षा सुधारणा, शिक्षण धोरण, विद्यार्थ्यांचे हक्क आणि रोजगार यांसारख्या व्यापक विषयांवर ते सातत्याने काम करणारी संघटित चळवळ बनेल.

तिसरा आणि सर्वात धोकादायक पर्याय म्हणजे आंदोलनातील उर्जा दिशाहीन होऊन केवळ 'सोशल मीडिया' मोहिमा, वैयक्तिक आरोप किंवा राजकीय ध्रुवीकरणात खर्च होईल. देशाला तिसरा पर्याय परवडणारा नाही. कारण भारत हा जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या असलेला देश आहे. या तरुण शक्तीला विधायक दिशा मिळाली, तर देशाच्या विकासाची सर्वात मोठी ताकद ठरू शकते. याउलट तिच्यात निराशा, अविश्वास आणि अराजकतेची भावना वाढली, तर संपूर्ण समाजावर दूरगामी परिणाम होतील. विद्यार्थी आंदोलनाने आता काही व्यापक प्रश्न स्वतःसमोर ठेवले पाहिजेत. परीक्षा व्यवस्थेची पारदर्शकता, प्रश्नपत्रिका सुरक्षित ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर, स्वतंत्र परीक्षा नियामक संस्था, वेळेवर निकाल, मानसिक आरोग्य सहाय्य, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी समान संधी, शिक्षणाचा वाढता खर्च, संशोधनासाठी आवश्यक सुविधा आणि गुणवत्तापूर्ण सार्वजनिक शिक्षण या विषयांवर सातत्याने अभ्यासपूर्ण भूमिका मांडली गेली पाहिजे. आंदोलन केवळ विरोधापुरते मर्यादित न राहता पर्यायही सुचवू लागले, तर त्याची विश्वासार्हता अनेक पटींनी वाढेल. या आंदोलनाने आणखी एक गोष्ट शिकण्याची गरज आहे. कोणत्याही लोकशाहीत आंदोलन ही शेवटची नव्हे, तर सुधारणा घडवून आणण्याची एक पद्धत असते. संवाद, अभ्यास, कायदेशीर मार्ग, जनजागृती आणि विधायक सहभाग या सर्व गोष्टी आंदोलनाइतक्याच महत्त्वाच्या असतात. विद्यार्थ्यांनी केवळ निषेधाची भाषा नव्हे, तर धोरणनिर्मितीची भाषाही शिकली पाहिजे. उद्याचे प्रशासक, डॉक्टर, अभियंते, संशोधक, शिक्षक आणि लोकप्रतिनिधी हे आजचेच विद्यार्थी आहेत. त्यामुळे आंदोलन करतानाच उद्याच्या जबाबदार नागरिकत्वाची जाणीवही त्यांनी जपली पाहिजे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने एक राजकीय जबाबदारी निश्चित झाली असे मानता येईल; परंतु त्याने सर्व प्रश्न सुटले, असे म्हणता येणार नाही. व्यक्ती बदलली म्हणून व्यवस्था आपोआप बदलत नाही. व्यवस्थात्मक सुधारणा, उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि विश्वास पुनर्स्थापित करणे ही अधिक मोठी प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे खरे यश एखाद्या राजीनाम्यात नसून भविष्यात अशा प्रकारच्या त्रुटी पुन्हा होऊ नयेत, अशी सक्षम यंत्रणा निर्माण करण्यात आहे. भारतीय समाजाला आज अशा विद्यार्थी चळवळीची गरज आहे, जी भावनेइतकाच विवेकही जपेल. संघर्षाइतकाच संवादही साधेल. निषेधाइतक्याच ताकदीने पर्यायही मांडेल आणि कोणत्याही राजकीय छायेखाली न राहता विद्यार्थ्यांच्या हिताचे स्वतंत्र व्यासपीठ उभे करेल. 'नीट' आंदोलनाने देशभरातील युवकांना एकत्र आणण्याचे काम केले आहे. आता या एकजुटीचे रूपांतर राष्ट्रीय शैक्षणिक सुधारणांच्या विधायक मोहिमेत करणे हीच त्याची पुढील कसोटी असेल.

**(लेखक व्यवस्थापनशास्त्र आणि अर्थशास्त्राचे अभ्यासक असून रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकपद भूषवले आहे.)**

# चर्चा आजची

# रायगडकरांना सुजलाम जलची प्रतीक्षा

**प्रमोद जाधव**

रायगड जिल्ह्याला पाणी टंचाईचा प्रश्न कायमच भेडसावत आहे. शाश्वत स्वच्छ पाणी देण्यासाठी सरकारने जलजीवनचा आधार घेतला. नागरिकांना मुबलक पाणी मिळेल, अशी अशा सर्वसामान्यांना होती. परंतू ही आशा पुर्णतः खोटी ठरली आहे. ही योजना सर्वसामान्यांपेक्षा ठेकेदारांचे खिसे भरण्यासाठी आणि टक्केवारीसाठी मोठ्या प्रमाणात वापरल्याचा आरोपही काही लोकप्रतिनिधींनी केला आहे. जलजीवन योजनांच्या कामांचा बोजवारा उडाल्याची चर्चा रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सुरु आहे. योजना राबवून घरात पाणी नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कामे अपुर्ण असताना बिले काढण्यात आल्याचा आरोप वेगवेगळ्या स्तरावरून होत आहे. आता मात्र या जलजीवन योजनेवर सुजलाम ची नजर राहणार आहे. या कामांवर लक्ष ठेवण्यासाठी सरकारने डिजीटलचा अधार घेतला आहे. त्यामुळे रायगडरांना या ॲपद्वारे सुजलाम जलची प्रतिक्षा लागून राहिली आहे.

पाणी टंचाई दुर करण्यासाठी हर घर जलअंतर्गत केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन योजना सुरु करण्यात आली.रायगड जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत होणाऱ्या या योजनांची काही कामे अपूर्ण तर काही योजनांची कामेपुर्ण होऊन नळाला पाणी नाही, अशी परिस्थिती आजही जिल्ह्यातील भागांमध्ये आहे. त्यामुळे जलजीवन योजना वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. आता मात्र या योजनेतून खोटी बिले काढण्यावर सुफलामची नजर राहणार आहे. केंद्र सरकारने सुजलाम भारत ॲप कार्यान्वीत केले आहे. हे ॲप या योजनेवर सुपरवायझरचे काम करणार असल्याची माहिती समोर आली आहे. टँकरने पाणी पुरवठा करण्यापासून सार्वजनिक विहीरी खोल करणे, गाळ काढणे, नवीन विंधन विहीरी घेणे तसेच विशेष दुरुस्ती करणे अशा अनेक प्रकारची कामे केली जातात. मात्र पाणी टंचाईचा प्रश्न जिल्ह्याला



कायमच भेडसावत आला आहे.अलिबागसह, महाड, पोलादपूर, पेण, माणगाव, रोहा, कर्जत, खालापूर अशा अनेक तालुक्यांतील लाखो नागरिकांना पाणी टंचाईची झळ पोहचते.पाणी टंचाई दुर करण्यासाठी केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन योजना जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत राबविण्यात आली. या योजनेमध्ये प्रतिदिन प्रतिमाणसी किमान ५५ लिटर याप्रमाणे पाण्याची उपलब्धता करणे अपेक्षित आहे. जल जीवन मिशन योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये १ हजार ४२२ योजनांची कामे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या वतीने हाती घेण्यात आली. करोडो रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. मात्र ६०० हून योजनांची कामे ५० टक्के पेक्षा अधिक अपूर्णस्थितीत असल्याची माहिती समोर आली आहे. जिल्ह्यातील १७० हून अधिक योजनांची २५ टक्के कामे शिल्लक आहेत. या १७० योजनांना सरकारने तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती दिली आहे. जिल्ह्यामध्ये काही योजनांची कामे पुर्ण होऊनही नळाला पाणी नाही. काही ठिकाणी विहीरी बांधण्यात आल्या आहेत, तर काही ठिकाणी पाईपलाईन जोडली आहे, तर काही ठिकाणी नळ जोडणी केली आहे. परंतु आजही अनेक गावांतील नागरिक पाण्यासाठी वणवण करीत आहेत. निधी अभावी अनेक कामे रखडल्याची माहिती समोर आली आहे. सरकारकडून १३४ कोटी रुपयांचा निधी या कामांसाठी येणे बाकी असल्याची माहिती जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून उपलब्ध झाली आहे. मात्र हा निधी अद्याप शासनाकडून प्राप्त झाला नाही.

जलजीवन योजना जिल्ह्यामध्ये वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. अपूर्ण कामे करून संपुर्ण बिले काढल्याचा आरोप होत आहे. ठेकेदार आणि अधिकारी यांच्या संगनमताने योजनेचे वाटोळे झाल्याचे जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी नुकतेच सांगितले. जलजीवन योजनेचे काम ठेकेदारांचे खिसे भरण्यापासून टक्केवारी मिळविण्यापर्यंत होत असल्याचा आरोपही लोकप्रतिनिधींनी केला. अधिक बिले काढल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

आता मात्र या योजनेवर सुजलामची नजर राहणार राहणार आहे. जलजीवन अंतर्गत येणाऱ्या ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्यवस्थेचे अचुक व्यवस्थापन आणि प्रत्यक्ष वेळ देख करण्यासाठी सुजलाम भारत ॲप हा डिजीटल उपक्रम सुरु करण्यात आला आहे.पाण्याची गुणवत्ता, पुरवठ्याचा दाब, पाण्याचा स्त्रोत कामाचे स्वरुप आदी माहिती लाईव्ह घेतली जाणार आहे. जलजीवन योजनेचे पाणी प्रत्यक्ष घरात पोहचते की नाही, हे तपासण्यासाठी सुजलाम भारत ॲप उपयुक्त ठरणार आहे. योग्य कामे करणाऱ्या ठेकेदारांनाच्या खात्यात त्यांच्या कामांची बिले जमा होणार आहेत. जलजीवन योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील पाण्याच्या योजनेची माहिती सूजलाम ॲपवर घेतली जाणार आहे. कनिष्ट अभियंता जागेवर जाऊन त्या ॲपवर ही माहिती संकलीत करणार आहे. इस्टीमेंट आणि मॅपिंग झाल्यावरच ठेकेदाराच्या खात्यात बील जमा केले जाणार असल्याचे ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले आहे. पाण्यासाठी वणवण करणाऱ्या जिल्ह्याली लाखो नागरिकांना आता सुजलामवर भरोसा ठेवून पाण्याची प्रतिक्षा करावी लागणार आहे.

# लोकसंसद

## शेवटी सर्वांचे ध्येय तर एकच, रुग्णसेवा!

महाराष्ट्र शासनाने अलिकडेच 'सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकोलॉजी' (सीसीएमपी) उत्तीर्ण होमिओपॅथी डॉक्टरांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत (एमएमसी) स्वतंत्र पुस्तिकेत नोंदणी सुरू केली आहे. त्यामुळे आता एमएमसी नोंदणीकृत सीसीएमपी उत्तीर्ण होमिओपॅथी डॉक्टर रुग्णांना ॲलोपॅथी औषधे देऊ शकतील. खरे तर ग्रामीण भागात आजही ॲलोपॅथी डॉक्टरांची मोठी कमतरता असून अशा परिस्थितीत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातून आधुनिक औषधशास्त्राचे रीतसर प्रशिक्षण घेतलेल्या या डॉक्टरांना प्राथमिक ॲलोपॅथी उपचारांची परवानगी मिळाल्यामुळेग्रामीणआरोग्ययंत्रणेलामोठाआधार मिळेल. दुसरीकडे आयएमए, मार्ड अशा काही संघटनांकडून याला विरोध होत असला तरी या सीसीएमपी उत्तीर्ण डॉक्टरांना सरसकट सर्व औषधे देण्याची परवानगी नाही. त्यांना केवळ शासन अधिसूचित प्राथमिक औषधेच लिहिता येणार असून हायअँटीबायोटिक्स किंवा गंभीर आजारांच्या औषधांवर बंदी आहे. तसेच शासनाने स्वतंत्र पुस्तिका ठेवून मुख्य ॲलोपॅथीत त्यांची नोंदणी केलेली नाही. आता वैद्यकीय संघटनांनी केवळ विरोध न करता ग्रामीण भागातील गरीब रुग्णांच्या हिताचा विचार करून या निर्णयाकडे सकारात्मकतेने पाहावे. शेवटी आयुर्वेदिक डॉक्टर असो, होमिओपॅथिक डॉक्टर असो वा ॲलोपॅथीक डॉक्टर असो, प्रत्येकाची स्वतंत्र ओळख असून वैद्यकीय उपचार पद्धती कोणतीही असो, प्रत्येक डॉक्टरचे ध्येय एकच असते ते म्हणजे रुग्ण सेवा आणि आरोग्य रक्षण करणे. त्यामुळे सर्वच उपचार पद्धतींचा योग्य सन्मान व्हावा ही अपेक्षा!

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

# दिनविशेष

# देशासाठी शहीद होणारे पहिले क्रांतिकारक खुदीराम बोस

ज्या वयात तरुण पिढी भावी आयुष्याची स्वप्न रंगवत असतात, त्या वयात त्यांनी त्याचं पूर्ण आयुष्य देशासाठी पणाला लावलं. ते थोर क्रांतिकारक म्हणजे खुदीराम बोस. बोस यांचा जन्म ३ डिसेंबर १८८९साली बंगालमधील मिदनापूर जिल्ह्यातील हबीबपूर गावात झाला. आई-वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या मोठ्या बहिणीनं त्यांचा सांभाळ केला. बंगालची फाळणी झाल्यानंतर बोस यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. सत्येन बोस यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी



त्यांचं क्रांतिकारी जीवन सुरू केलं. नववीत असताना त्यांनी शाळा सोडली आणि त्यांचा पूर्ण वेळ देशासाठी दिला.

२८ फेब्रुवारी १९०६साली सोनार बंगला नावाचं एक जाहिरात पत्रक वाटत असताना बोस यांना पोलिसांनी पकडले. दरम्यान बोस यांनी हुशारीनं त्यांना चकमा देत तिथून पळ काढला. त्यानंतर १६ मे १९०६ रोजी पोलिसांनी त्यांना अटक केली पण अल्पवयीन असल्या कारणाने त्यांना समज देऊन त्यांना सोडण्यात. ६ डिसेंबर १९०७मध्ये बंगालमध्ये नारायणगड रेल्वे स्थानकावर झालेल्या बॉम्बस्फोटाच्या कटात बोस यांचा सहभाग होता.

किंग्सफोर्ड चीफ प्रेसिडेंसी मॅजिस्ट्रेट हे क्रुर अधिकारी म्हणून ओळखले जातं होते. फक्त क्रांतिकारकांना त्रास देणं हा त्यांच्या मुळं उद्देश होता. म्हणून क्रांतिकारकांनी त्यांची हत्या करण्याचा कट योजना आखली. युगांतर क्रांतिकारी दलाचे नेते वीरेंद्र कुमार यांनी किंग्सफोर्डच्या हत्येची कामगिरी खुदीराम बोस आणि प्रफुल्ल चंद यांच्याकडं सोपवली. प्रफुल्ल चंद आणि खुदीराम बोस दोघं किंग्सफोर्डला मारण्यासाठी बिहारला रवाना झाले. बिहारला पोहचल्यानंतर आठ दिवस त्यांनी किंग्सफोर्ड आणि त्यांच्या कुटुंबावर पाळत ठेवली. ३० एप्रिल १९०८ साली रात्री साडे आठच्या दरम्यान किंग्सफोर्डच्या बग्गीवर बॉम्ब हल्ला केला पण त्यांचा अंदाज चुकला आणि त्या हल्ल्यात किंग्सफर्डची पत्नी आणि मुलीचा मृत्यू झाला.

हल्ल्यात किंग्सफोर्डचा मृत्यू झाला असं समजून दोघांनीही तिथून पळ काढला आणि पूसा रेल्वे स्थानकात पोहचले. रेल्वे स्थानकात पोहचल्यानंतर त्यांच्या हालचालीवरून पोलिसांना संशय आला आणि तिथेच त्यांना घेरण्यात आलं. आता आपल्याला अटक होणार हे जाणताच प्रफुल्ल चंद यांनी स्वतःवर गोळी झाडली तर खुदीराम बोस यांना पोलिसांनी अटक केली. बोस यांच्यावर हत्येचा खटला दाखल करण्यात आला. केवळ पाच दिवस चाललेल्या या खटल्यात त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांनी ही त्यांचा गुन्हा कबुल करत फाशीची शिक्षा स्वीकारली. ११ ऑगस्ट १९०८ साली त्यांना फासावर चढवण्यात आलं. त्यांच्या स्मरणार्थ पुसा रेल्वे स्थानकाचं नाव खुदीराम बोस स्थानक करण्यात आलं आहे.

खुदीराम बोस यांच्या फाशीनंतर बंगालमध्ये त्यांची लोकप्रियता वाढली. बंगालमधील जुलाह भागात एक खास धोतर बनवण्यात आलं या धोतराच्या काठावर खुदीराम असं लिहिलं होतं. स्वातंत्र्य चळवळीत प्राणाची आहुती देणारे खुदीराम बोस पहिले क्रांतिकारक होते.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे
११ ऑगस्ट
१) श्री.रणजित बाळाराम पाटील
अलिबाग, ११-८-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**
**ॲड.जुनेद अल्ताफ घट्टे, वाढदिवस अलिबाग**

## रातवडचे विद्यार्थी रमले वर्षासहलीत

**माणगाव :** छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात वनविहार व वर्षासहलीचे आयोजन शुक्रवारी (दि.७) निळज गाव परिसरात करण्यात आले होते. विद्यालयाच्या पंचक्रोशीतील निळज गावातील माळरानावर विद्यार्थ्यांनी मनमुराद निसर्गाचा आनंद घेतला. शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी नवीन होणाऱ्या एमआयडीसी परिसर, धरण परिसर, ओहोळ व विविध झुडपांचे निरीक्षण केले. विविध पानांचे आकार, रंग तसेच पावसाळ्यातील दिवसात उगवणारी फुले यांचे निरीक्षण केले. काही विद्यार्थ्यांनी या फुलांपासून सुंदर पुष्पगुच्छ बनविले. पावसाच्या सरी व वाहणाऱ्या ओहोळामधून मनसोक्त हिंडत विद्यार्थ्यांनी वनविहाराचा तसेच माळरानावर मनसोक्त खोखो, कबड्डी, फुटबॉल खेळाचा मनमुराद आनंद घेतला.

# पावसाळ्यातही पाण्यासाठी टाहो!

**● उपमहापौरांच्या प्रभागातच निम्माच पाणीपुरवठा ● कळंबोली-रोडपालीकर टँकरच्या भरवशावर**




**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

पावसाळा सुरू असतानाही पनवेल महापालिका क्षेत्रातील कळंबोली-रोडपाली परिसरातील नागरिकांना पाण्यासाठी टाहो फोडण्याची वेळ आली आहे. विशेष म्हणजे, महापालिकेच्या उपमहापौरांच्या प्रभागातच पाणीपुरवठ्याची ही गंभीर समस्या निर्माण झाल्याने महापालिका प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

कळंबोली आणि रोडपाली परिसरातील अनेक भागांत अपुरा आणि अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. परिसराची दररोजची पाण्याची गरज सुमारे ३२ एमएलडी असताना प्रत्यक्षात केवळ १९ ते २२ एमएलडी पाणीपुरवठा होत असल्याचे सांगण्यात येत आहे.

त्यामुळे मागणीच्या तुलनेत मोठी तूट निर्माण झाली असून, त्याचा थेट फटका रहिवाशांना बसत आहे.

रोडपालीतील सेक्टर १७ ते २० तसेच कळंबोलीतील अनेक सोसायट्यांमध्ये नियमित पाणी मिळत नसल्याने रहिवाशांना टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. काही सोसायट्यांना दरमहा शेकडो टँकर मागवावे लागत असून, त्यासाठी लाखो रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार सोसावा लागत आहे. पावसाळ्यातही पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना पैसे मोजावे लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान, पाणीटंचाईच्या प्रश्नावर उपमहापौर प्रमिला पाटील यांनी महापालिका आयुक्तांची भेट घेऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. कळंबोली-रोडपाली परिसरात महापालिकेमार्फत टँकरने पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. तसेच मोठ्या प्रमाणात टँकरचे पाणी खरेदी करणाऱ्या सोसायट्यांना किमान मोफत पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

### पाणीटंचाईचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी

एका बाजूला मुसळधार पावसामुळे शहरातील विविध भागांत पाणी साचत आहे, तर दुसऱ्या बाजूला नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची वाट पाहावी लागत आहे. त्यामुळे महापालिकेच्या पाणीपुरवठा नियोजनाबाबत नागरिकांमध्ये नाराजी आहे. कळंबोली-रोडपालीतील पाणीटंचाईचा प्रश्न तातडीने मार्गी लावून नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा करावा, अशी मागणी रहिवाशांकडून होत आहे.

## तक्का परिसरातील रस्त्यांची दुरवस्था



**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी।**

पनवेलमधील तक्का परिसरातील रस्त्यांची मुसळधार पावसामुळे अक्षरशः चाळण झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. काही ठिकाणी खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने त्यांचा अंदाज येत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. तर काही भागात मोठ्या प्रमाणावर चिखल साचल्याने रस्ता निसरडा झाला आहे. विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हा रस्ता धोकादायक ठरत आहे. चिखलातून दुचाकी घसरून अपघात होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

मुसळधार पावसात रात्रीच्या वेळी परिस्थिती आणखी गंभीर होत असल्याचे वाहनचालकांचे म्हणणे आहे. रस्त्यावरील खड्डे आणि चिखलामुळे वाहनांचेही नुकसान होत आहे. स्थानिक नागरिकांनी अनेकदा संबंधित प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्याचे सांगितले. मात्र अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळा सुरू असतानाच रस्त्यांची तातडीने डागडुजी करण्याची मागणी होत आहे. खड्ड्यांमध्ये खडी अथवा मुरूम टाकून तात्पुरती डागडुजी करण्याची आवश्यकता आहे.

नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होण्यापूर्वी पालिका प्रशासनाने टक्के परिसरातील रस्त्यांची तातडीने पाहणी करून योग्य उपाययोजना करावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.




## साई ट्रस्टकडून दिव्यांग विद्यार्थ्याला व्हीलचेअर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्टकडून नेरळ गावातील जिल्हा परिषद शाळा क्रमांक दोनमधील एका दिव्यांग विद्यार्थ्याला व्हीलचेअर भेट देण्यात आली. यावेळी श्री साई ट्रस्टचे अध्यक्ष गणेश नायर, लक्ष्मी नायर, संचालिका राधिका घुले, त्या शाळेचे मुख्याध्यापक पी.टी. राठोड यांच्यासह दिलीप घुले हे उपस्थित होते. नवी मुंबई येथील तसेच कुमार, अनिता नेगी यांच्या सहकार्याने व्हीलचेअर उपलब्ध झाली. तर विद्यार्थ्यांसोबत शाळेचे शिक्षक हश्मी, तायडे आदींसह पालक उपस्थित होते.

शैक्षणिक वाटप तसेच आरोग्याच्या प्रश्नावर श्री साई ट्रस्ट कार्य करीत आहे.

## मंगेश पाटील यांना मातृशोक

**माणगाव :** माणगाव नगरपंचायतीचे कर्मचारी मंगेश पाटील यांच्या मातोश्री मनोरमा मनोहर पाटील यांचे शुक्रवारी (दि.७) राहत्या घरी ग्रीन सिटी माणगाव येथे वृद्धापकाळाने निधन झाले.



मृत्यूसमयी त्या ८१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी रविवार दि.१६ ऑगस्ट रोजी तर उत्तरकार्यविधी १८ ऑगस्ट रोजी राहत्या घरी होणार असल्याची माहिती त्यांचे सुपुत्र मंगेश पाटील यांनी दिली.

## पनवेलमध्ये आदिवासी दिनानिमित्त जल्लोष



**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी विद्यार्थी कृती समिती महाराष्ट्राच्या वतीने पनवेलमध्ये भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. खांदा कॉलनी येथील आदिवासी वसतिगृहापासून या रॅलीला सुरुवात करण्यात आली. रॅलीमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच महिला सहभागी झाल्या होत्या.

पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी परिसराचे लक्ष वेधून घेतले. आदिवासी संस्कृती आणि परंपरेचे दर्शन घडविणारे पारंपरिक तारफा नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले. ढोल-ताशांच्या गजरात आणि उत्साहपूर्ण वातावरणात रॅली पुढे मार्गस्थ झाली.

रॅलीदरम्यान आदिवासी समाजाच्या आराध्य दैवताला अभिवादन करण्यात आले. आदिवासी संस्कृती, परंपरा आणि अस्मिता जपण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

रॅली पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचल्यानंतर विविध ठिकाणांहून आलेले आदिवासी बांधव एकत्र आले. यावेळी आदिवासी समाजाच्या एकजुटीचे दर्शन घडले.

**■ विद्यार्थ्यांची भव्य रॅली**

**■ पारंपरिक तारफा नृत्याने वेधले लक्ष**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त समाजातील नागरिकांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाला प्राधान्य देण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. विद्यार्थिनींचा रॅलीतील लक्षणीय सहभाग हा महिला शिक्षण आणि सक्षमीकरणाचा संदेश देणारा ठरला. पारंपरिक संस्कृती जपत आधुनिक शिक्षणाची कास धरण्याचा निर्धार या रॅलीतून व्यक्त झाला. रॅलीदरम्यान आदिवासी एकजुटीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यामुळे पनवेल शहरात काही काळ आदिवासी संस्कृतीचा उत्साहपूर्ण रंग पाहायला मिळाला.

## यांत्रिक पद्धतीने भात लागवड



**। तळा । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान योजनेअंतर्गत मेढे येथे भात पिकाची यांत्रिक पद्धतीने लागवड करण्यात आली. सर्वेश्वर शेतकरी बचत गट, मेढे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात सर्वेश्वर शेतकरी गटातील शेतकऱ्यांनी यंत्राच्या सहाय्याने भात लागवड केली. पारंपरिक पद्धतीने भात लागवडीसाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ, वेळ आणि मजुरीची आवश्यकता असते. सध्या मजुरांची कमतरता व वाढती मजुरी यामुळे वेळेत भात लागवड पूर्ण करणे शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर यांत्रिक पद्धतीने भात लागवड ही वेळ, श्रम व खर्चाची बचत करणारी प्रभावी पद्धत ठरत आहे.

## रॅलीतून घडले आदिवासी संस्कृतीचे दर्शन

**। शिहू । प्रतिनिधी ।**

निसर्ग आणि मानवी जीवन यांच्यातील हाच अनोखा समतोल जपणारी आणि आपली समृद्ध परंपरा अभिमानाने पुढे नेणारी संस्कृती नागोठणे नजीक असलेल्या बोरावाडी आदिवासी वाडीत प्रकर्षाने पाहायला मिळाली. येथील स्थानिक तरुणांनी आणि समस्त गावकऱ्यांनी एकत्र येत यंदाच्या जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून आपल्या पारंपरिक संस्कृतीचे आणि लोककलांचे अतिशय सुंदर व विहंगम दर्शन सर्वांना घडवून आणले.



या सोहळ्याची सुरुवात बोरावाडी येथील समाजमंदिरात भावूक आणि प्रेरणादायी वातावरणात झाली. सकाळी १० वाजता देशातील आणि समाजातील महान शहीद आदिवासी नेत्यांच्या प्रतिमांना विनम्र अभिवादन करत पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर संपूर्ण बोरावाडी आणि लालडोंगर परिसरात एक भव्य व नेत्रदीपक रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये आबालवृद्धांनी आपली पारंपरिक वेशभूषा परिधान करून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. ढोल, ताशे आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात तरुणाईने तारपा नृत्यावर ठेका धरत विविध लोकनृत्य सादर केली. या मंगलमय आणि उत्साही वातावरणामुळे संपूर्ण लालडोंगर आणि बोरावाडी परिसर पारंपरिक लोकसंस्कृतीच्या रंगात न्हाऊन निघाला होता.

रॅलीनंतर आयोजित करण्यात आलेल्या मुख्य कार्यक्रमात विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून प्रभावी समाजप्रबोधन करण्यात आले. समाजातील विविध कलाकारांनी आपल्या कलांचे सादरीकरण करत उपस्थितांची मन जिंकली. या सोहळ्यात परिसरातील नागरिक, महिला आणि तरुण वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद लुटला.

**पाचशेहून अधिक श्री सदस्यांचे श्रमदान** | **दोन तासांत दोनशे रोपांची लागवड**

# वणीच्या माळरानावर फुलणार हिरवीगार वनराई

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने खालापूर तालुक्यातील वणी येथील वनविभागाच्या जागेवर वृक्षारोपणाचा भव्य उपक्रम राबविण्यात आला. डॉ. श्री. अप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री बैठक खोपोली समितीच्या माध्यमातून ५०० हून अधिक श्री सदस्यांनी सहभाग घेतला. यावेळी अवघ्या दोन तासांत २०० रोपांची लागवड केली. श्री सदस्यांच्या सामूहिक श्रमातून वणीच्या माळरानावर भविष्यात हिरवीगार वनराई उभी राहणार आहे.



वनविभागाचे वन परीक्षक अधिकारी नितीन कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. नितीन कांबळे यांच्या हस्ते रोपाचे विधिवत पूजन करून श्रीफळ वाढविण्यात आले. त्यानंतर श्री सदस्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने वृक्षारोपणास सुरुवात केली.

या उपक्रमाची पूर्वतयारी दोन दिवस आधीपासून करण्यात आली होती. पाच एकरांहून अधिक क्षेत्रात वृक्षलागवडीसाठी सुमारे दोन फूट खोल खड्डे खोदण्यात आले. या कामातही शेकडो श्री सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कोणतीही अपेक्षा न ठेवता श्रमदान केले.

रविवारी सकाळी आठ वाजता वृक्षारोपणाला सुरुवात झाली. रोपांची उंची आणि वाढ लक्षात घेऊन योग्य अंतर ठेवत शास्त्रशुद्ध पद्धतीने लागवड करण्यात आली. ५०० हून अधिक श्री सदस्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने काम केल्याने अवघ्या दोन तासांत २०० रोपांची लागवड पूर्ण करण्यात आली. सेवा, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी यांचा आदर्श घालून देणाऱ्या या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला. शेकडो श्री सदस्यांच्या हातांनी वणीच्या मातीत रुजवलेली २०० रोपे येत्या काही वर्षांत हिरवाईची नवी कहाणी लिहिणार आहेत.

### पुढील पिढीसाठी हिरवाईची ठेव

वणीच्या मातीत लावण्यात आलेली ही छोटी-छोटी रोपे भविष्यात मोठी झाडे बनतील. त्यांच्या सावलीत पुढील पिढ्या विसावतील, पक्ष्यांना आसरा मिळेल आणि परिसरातील जैवविविधतेला चालना मिळेल. त्यामुळे हे श्रमदान केवळ वृक्षारोपण नसून भावी पिढीसाठी निसर्गाची अमूल्य ठेव निर्माण करण्याचा संकल्प ठरला आहे.

### हातात साधने, मनात सेवाभाव !

या श्रमदानाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक श्री सदस्य आपापल्या घरून घमेला, फावडे, टिकाव, पहार, कोयता आदी आवश्यक साधने घेऊन या सेवाकार्यात सहभागी झाला होता. कोणतीही घाईगडबड अथवा गोंधळ न करता प्रत्येक जण सेवाभावाने आपली जबाबदारी पार पाडताना दिसत होता.

## निवडक



## तळा येथे आदिवासी दिन साजरा

**तळा :** तळा तालुक्यात असलेल्या २४ आदिवासी वाड्यातील सर्व नागरिकांनी एकत्र येत रविवारी (दि.९) मोठ्या उत्साहात आदिवासी दिन साजरा केला. आदिवासी समाजाच्या समस्या, त्यांचे अधिकार, हक्क, अस्तित्व, चालीरिती यांचे रक्षण व्हावे म्हणून सन १९९४ साली संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक आदिवासी वर्ष घोषित केले आणि ९ ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा करण्यात येऊ लागला. त्या अनुषंगाने तळा तालुक्यात आदिवासी दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात आदिवासी समाजाचे आदर्श असलेल्या हुतात्मा नाग्या कातकरी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. तसेच आदिवासी बांधवांकडून सामूहिक आदिवासी प्रतिज्ञा घेऊन पारंपरिक आदिवासी गीत गायन करण्यात आले. यानिमित्ताने चंडिका मंदिर ते नगरपंचायत कार्यालय अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीत आदिवासी बांधव व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.



## क्रांती दिनानिमित्त हुतात्म्यांना अभिवादन

**चिरनेर :** चिरनेर ग्रामपंचायतीच्या वतीने तसेच आदिवासी बांधवांच्या वतीने आदिवासी जागतिक दिनाचे आयोजन रविवारी (दि.९) करण्यात आले होते. यावेळी चिरनेर हायस्कूलपासून श्री महागणपती मंदिरापर्यंत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅली दरम्यान 'एक तीर एक कमान सारे आदिवासी एक समान' असा रॅलीतून नारा देण्यात आला. यावेळी चिरनेर रांजणपाडा चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार घालून मानवंदना देण्यात आली. त्यानंतर श्री महागणपतीचे दर्शन घेऊन, क्रांतीदिनानिमित्ताने चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांना पुष्पमालिका अर्पण करत अभिवादन करण्यात आले. त्यानंतर येथील रंगमंचावर कार्यक्रमाला सुरुवात केली. यावेळी आदिवासी बांधवांनी आदिवासी सांस्कृतिक संस्कृतीचे कार्यक्रमातून दर्शन घडविले. यात पावली नाच, डबा ढोलकी नाच, कोथंबिरी नाच, गौरी नाच अशा पारंपारिक नृत्याचा अविष्कार साकार करत आदिवासी बांधवांनी आपल्या सांस्कृतिक आदिवासी संस्कृतीचे जतन केले. यावेळी अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली होती.

## नगरपरिषदेतर्फे हुतात्म्यांना अभिवादन



**कर्जत :** कर्जत नगरपरिषदेच्या वतीने ऑगष्ट क्रांती दिनी आमराई येथील हुतात्मा स्तंभाच्या येथे कर्जत तालुक्यातील हुतात्म्यांना तसेच दिवंगत स्वातंत्र्य सैनिकांना अभिवादन करण्यात आले. कर्जत शहरातील आमराई येथील हुतात्मा स्तंभाला तेथे नगराध्यक्ष पुष्पा दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी नगरसेवक अशोक राऊत, नगरसेविका अरुणा वायकर, सुचिता खोत, नेहा शिंदे, सुमिता गायकवाड, जान्हवी देवघरे, राधिका पवार, कार्यालयीन अधिक्षक रवींद्र लाड, इतिहास अभ्यासक वसंत कोळंबे, भगवान धुळे, विजय कोंडीलकर, मोहन सुर्वे, बाळासाहेब मोरे आदी उपस्थित होते. वसंत कोळंबे यांनी कर्जत तालुक्यातील हुतात्मा भाई कोतवाल, हुतात्मा हिराजी पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यांनी स्वातंत्र्यासाठी केलेल्या कार्याची माहिती सांगितली. भगवान धुळे यांनी स्मृती स्तंभाचा परिसराच्या भिंतींना टाईल्स लावाव्यात, अशी सूचना केली. याप्रसंगी सुदेश देवघरे, रामचंद्र खरमरे, श्रीकांत आगीवले, सुनिल कोळंबे, कल्याणी लोखंडे, बापू बहिरम, रुपेश पाटील, सुदेश गायकवाड आदी उपस्थित होते.




## परळीत जागतिक आदिवासी दिन साजरा

**पाली :** परळी येथील आदिवासी समाज बांधवांच्या वतीने जागतिक आदिवासी दिन पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शहरात भव्य रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रबोधन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक प्रमुख मान्यवरांनी उपस्थिती लावून समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या. भव्य रॅली आणि पारंपरिक नृत्यउत्सवाची सुरुवात क्रांतीवीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यानंतर शहराच्या प्रमुख मार्गावरून भव्य रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये पारंपरिक वेशभूषा केलेले आदिवासी बांधव, महिला आणि लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाली होती. पारंपारिक वाद्यांच्या गजर आणि नृत्याने संपूर्ण शहराचे लक्ष वेधून घेतले. जय आदिवासी आणि बिरसा मुंडा अमर रहे अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

## तिसले येथे 'नैसर्गिक शेतीशाळा'

**आगरदांडा :** मुरुड तालुक्यातील आंबोली ग्रामपंचायत हद्दीतील तिसले येथे सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम यांच्या मार्गदर्शनाखाली भात पीक उत्पादक शेतकऱ्यांसाठी कीड रोग सर्वेक्षण सल्ला व प्रकल्प क्रॉपसॅप अंतर्गत भात पिकाची 'नैसर्गिक शेतीशाळा' घेण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे महत्त्व, भात पिकातील कीडरोग व्यवस्थापन तसेच पर्यावरणपूरक शेती पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी नैसर्गिक शेतीशाळेत तालुका कृषी अधिकारी प्रमोद नरळे, सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम, पराग भोजने, प्रगतशील शेतकरी काशिनाथ पाटील, आदेश भोईर, हिना शेख यांच्यासह परिसरातील भात उत्पादक शेतकरी उपस्थित होते. पराग भोजने, हिना शेख तसेच तालुका कृषी अधिकारी प्रमोद नरळे यांनी शेतकऱ्यांना भात पिकातील विविध बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले. भात पिकामध्ये आढळणाऱ्या विविध किडी व रोगांची लक्षणे, त्यांची ओळख, पिकाचे नियमित निरीक्षण आणि योग्य वेळी करावयाच्या उपाययोजनांबाबत शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली.

## निवडक


● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

### विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक उत्साहात

**आगरदांडा :** मुरूडमधील जंजिरा विद्या मंडळ संचलित सर एस.ए. हायस्कूल व स्व. म. ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक लोकशाही पद्धतीने पार पडली. विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुकीत मुलींच्या गटातून ४ उमेदवार, तर मुलांच्या गटातून ३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. शाळेतील प्रत्येक वर्गाचे वर्ग प्रतिनिधी व उपवर्ग प्रतिनिधी यांना मतदानाचा अधिकार देण्यात आला होता. मुलींनी मुलींच्या उमेदवारांना तर मुलांनी मुलांच्या उमेदवारांना मतदान करून लोकशाही प्रक्रियेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मतमोजणीनंतर मुलींच्या गटातून श्रद्धा दिनेश नवघरकर, तर मुलांच्या गटातून रुद्र मंगेश सावकार या निवडणुकीत विजयी घोषित करण्यात आले. तद्नंतर त्यांची विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून निवड झाल्याची घोषणा करण्यात आली. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी मिलिंद खामकर, सीमा तांबडकर, डी. टी. शिंदे, सिद्धेश अंबुकर, अक्षय पाटेल यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी सुधाकर दांडेकर, सरोज राणे, संस्थेचे सर्व संचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींचे अभिनंदन केले.



### शालेय विद्यार्थ्यांना 'ए आय'ची ओळख

**श्रीवर्धन :** भविष्यकालीन शिक्षण आणि करिअरच्या संधी लक्षात घेता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, या उद्देशाने दांडगुरी व वाळवटी येथील शाळांमध्ये ए आय या विषयावर मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. श्रीवर्धन तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या रामचंद्र पांडुरंग दिवेकर दांडगुरी हायस्कूलमध्ये ११० विद्यार्थ्यांनी, तर किसान हायस्कूल, वाळवटी येथे ९० विद्यार्थ्यांनी इयत्ता आठवी ते दहावी दरम्यानच्या सत्रांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.या सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना ए आय ची संकल्पना, इतिहास, कार्यपद्धती आणि दैनंदिन जीवनातील मोबाईल, शेती, आरोग्य व शिक्षणातील ए आय चे उपयोग सोप्या भाषेत समजावून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनीही विविध प्रश्न विचारून आपली जिज्ञासा व्यक्त केली. केवळ माहिती देणे नसून विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण करणे आणि भविष्यासाठी त्यांना तयार करणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता. दोन्ही शाळांच्या मुख्याध्यापकांनी या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यात प्रत्यक्ष थेट प्रात्यक्षिकांसह अशी सत्रे आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली. ग्रामीण भागात तंत्रज्ञानाचा प्रसार करणारा हा उपक्रम अत्यंत मार्गदर्शक ठरला. महेश गुरव, विक्रांत धनावडे यांच्या पुढाकाराने आयोजित या उपक्रमाचा श्रीवर्धन तालुक्यातील सुमारे दोनशे विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.



### डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**नागोठणे :** एस.एस.ओ.एस.पी. डिप्लोमा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, नागोठणे येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी द्वितीय वर्ष डिप्लोमा विद्यार्थ्यांसाठी परिचय व मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रावणी जाधव हिने केले. यावेळी तिने प्राचार्य डॉ. प्रवेश यादव यांच्या शैक्षणिक पात्रता, अनुभव व कार्याचा परिचय उपस्थितांना करून दिला. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाची दिशा, अभ्यासाचे महत्त्व आणि करिअर नियोजन याबाबत मार्गदर्शन करताना प्रा. विशाल पाटील, प्रा. निधी ढसाळे तसेच प्रा. सागर सुरेकर यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, कौशल्य विकास, शिस्त आणि सातत्य यांचे महत्त्व पटवून दिले. तर प्राचार्य डॉ. प्रवेश यादव यांनी व्यक्तीमत्त्व विकास आणि उद्योगविश्वातील अपेक्षा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- दिशा पॅथॉलॉजी लॅब, मध्ये नोकरीची संधी! १) नर्स १ पद(चोंढी शाखा ) अनुभवी / फ्रेशर्स दोन्ही अर्ज करू शकतात. वेळ : डे शिफ्ट २) डिलिव्हरी बॉईज २-पदे -(अलिबाग शहर) स्वतःचे टू-व्हीलर व वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. संपर्क : ८५५२८ ५५२८८ दिशा पॅथॉलॉजी लॅब, अलिबाग
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, वेटर, हाऊसकिपर, इंडियन चायनीज कुक, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- जन्नावर हॉस्पिटल चेंढरे अलिबागमध्ये कामासाठी मावशी, स्टाफ नर्ससाठी जागा आहे. संपर्क : ७७९८०३४५०९
- ऑफिस स्टाफ आवश्यक Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियम वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड संपर्क : ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८ इच्छूक उमेदवारांनी संपर्क साधावा.
- गाळा भाड्याने मिळेल. ९४२३३७५१९८/८४११०१६४४४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# जनतेचा जीव स्वस्त झाला आहे का ?

## रेवदंडा हायस्कूलसमोर जीवघेणा खड्डा; विद्यार्थी, पालक, नागरिकांचा संताप

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

रेवदंडा हायस्कूलसमोरील अलिबाग-रेवदंडा मार्गावरील मोठा खड्डा नागरिकांच्या जीवावर उठला असून, या खड्ड्यामुळे आतापर्यंत अनेक दुचाकीस्वार अपघातग्रस्त झाल्याच्या घटना घडल्या आहेत. विशेषतः शाळकरी मुलांना घेऊन ये-जा करणारे पालक या खड्ड्याचे बळी ठरत असून, अनेकांना हात-पाय फ्रॅक्चर झाल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली आहे. रेवदंडा हायस्कूलसमोरील हा परिसर अत्यंत वर्दळीचा आहे. येथे चार रस्त्यांचा संगम असून शाळा, एसटी बसथांबा आणि बाजारपेठ जवळ असल्याने दिवसभर नागरिकांची आणि वाहनांची मोठी गर्दी असते. शाळा सुटण्याच्या वेळी तर विद्यार्थ्यांची, पालकांची आणि वाहनांची प्रचंड



लगबग असते. अशा ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी पडलेला खड्डा अपघातांना निमंत्रण देत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक वाहनचालकांना गर्दीमुळे किंवा समोरून येणाऱ्या वाहनांच्या धांदलीत हा खड्डा लक्षात येत नाही. परिणामी दुचाकी घसरून पडण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. काही अपघातांमध्ये लहान मुलांनाही दुखापती झाल्याचे सांगितले जात आहे. सुदैवाने अद्याप जीवितहानी झाली नसली तरी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. विशेष म्हणजे या खड्ड्याबाबत अनेक वेळा तक्रारी करूनही सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही ठोस दखल घेतलेली नाही. शासनाच्या विविध स्तरांवर तक्रारी दाखल झाल्याचे नागरिक सांगत असताना, प्रत्यक्षात मात्र, खड्डा तसाच असल्याने विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांनी स्थानिक लोकप्रतिनिधी व पुढाऱ्यांकडेही समस्या मांडली असता, हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे काम आहे, आमचा संबंध नाही, अशी उत्तरे मिळत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?, एखाद्याचा बळी गेल्यानंतरच खड्डा बुजवला जाणार का? असे संतप्त प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. शासन कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांच्या घोषणा करत असताना, विद्यार्थी आणि नागरिकांच्या जीवाशी खेळणारा हा खड्डा मात्र, प्रशासनाच्या दुर्लक्षाची साक्ष देत उभा आहे. रेवदंडा हायस्कूलसमोरील हा जीवघेणा खड्डा तातडीने भरून रस्ता सुरक्षित करण्यात यावा, अन्यथा तीव्र लोकआंदोलन उभारण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

### सार्वजनिक बांधकाम विभाग झोपेत?

दरम्यान, महाराष्ट्र शासन आणि सार्वजनिक बांधकाम विभाग नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देणार की आणखी एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहणार? अशी संतापजनक चर्चा सध्या रेवदंडा परिसरात रंगली आहे.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**| पनवेल | प्रतिनिधी |**

स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल येथील गुरु लिंगेश्वर शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला बौद्धजन पंचायत समिती पनवेल तालुकाध्यक्ष विजय गायकवाड उपस्थित होते. तसेच, स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टीचे प्रशांत सोनवणे, पनवेल महानगर अध्यक्ष निलेश कांबळे, चंद्रकांत वेळासकर, आसिफ शेख, जावेद मास्टर, बाबा नाईक, भारत दाताड, नरेश परदेशी, अशोक कदम आणि हर्षल साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## नामदेव महाराजांचा समाधी सोहळा

**मुरूड जंजिरा :** शिंपी समाजातर्फे संत श्रेष्ठ नामदेव महाराजांचा ६७६ वा समाधी सोहळा मुरूड येथील शिंपी समाज हॉलमध्ये सोमवारी सकाळी उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी येथील प्रसाद कजबजे दाम्पत्याचे हस्ते संत नामदेव प्रतिमेचे विधिवत पूजन झाले. या प्रसंगी प्रारंभी मुरूड नामदेव महिला मंडळाकडून भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रतिभा बागडे, वैशाली लखमदे, राजश्री सद्रे, गीता सुकाळे, उमा बागडे, सुनीता करंबे, श्रद्धा कजबजे, आदीने मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

## आदिवासी दिनानिमित्त ब्लँकेटचे वाटप

**| सोगाव | प्रतिनिधी |**

जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने रविवारी (दि.९) ऑगस्ट रोजी मुनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी सोगाव, चोरोंडे येथील दोन्ही आदिवासी वाडीवर जाऊन आदिवासी बांधवांना शुभेच्छा देत सामाजिक बांधिलकी म्हणून ब्लँकेटचे वाटप केले. सामाजिक कार्यकर्ते घाडी हे आदिवासी बांधवांच्या प्रगतीसाठी नेहमीच झटत असतात, त्यांनी आजपर्यंत आदिवासी बांधवांसाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून निवारा शेड, तसेच रस्ते, वीज, पाणी आदी मूलभूत प्रश्नमार्गी लावले आहेत. त्यांचाच एक



भाग म्हणून अलिबाग तालुका काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष सुनिल थळे यांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. यावेळी आदिवासी वाडीवर सामाजिक कार्यकर्ते सतिश घाडी, सचिन घाडी, समद कुर, लाईक कप्तान, दिलीप मोंढे, गंगाराम ठकरूळ, मनिष खाडे, शैलेश तिर्लो टकर, सूचित थळे, मुनावर कुर, अशोक मोंढे, प्रतिक पाटील, आशिष पाटील व सचिन घाडी मित्रमंडळाचे सर्व सदस्य व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच आदिवासी महिला व पुरुष बांधव देखील मोठ्या मोठ्या संख्येने उपस्थित होते. ब्लँकेटचे वाटप केल्याबद्दल सुनिल थळे व सचिन घाडी यांचे विशेष आभार मानले.

## लोकशाही पद्धतीने विद्यार्थी परिषद निवडणूक

### नवनिर्वाचित विद्यार्थी नेत्यांवर जबाबदारी

**| पेण | प्रतिनिधी |**

नेतृत्व म्हणजे केवळ पद मिळवणे नव्हे, तर जबाबदारी स्वीकारून इतरांना योग्य दिशा देणे होय. या विचाराला अधोरेखित करत कोनायन्सस स्कूलमध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी नेतृत्व पदग्रहण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव, प्रामाणिकपणा, शिस्त तसेच लोकशाही मूल्यांची रुजवणूक करण्याचा संदेश देण्यात आला.

एनव्हीजी एजुव्हेंचर्स फाऊंडेशनच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष डॉ. मनीष वनगे, उपाध्यक्ष अॅड. मंगेश नेने, सचिव डॉ. सोनाली



वनगे, खजिनदार ज्योती गुरव, व्यवस्थापन सदस्य प्रकाश गुरव, तसेच डॉ. सिद्ध वनगे आणि अॅड. अधिराज नेने यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शाळेच्या प्रा. सुप्रिया विखणकर, प्राथमिक विभागाच्या प्राचार्या जमिला शिरपुरवाला, शाळा व्यवस्थापक अॅड. आदित्य तेरेदेसाई, समन्वयक अपूर्वा म्हात्रे आणि प्रशासक अॅड. आहाना पाटील यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेली विद्यार्थी परिषद निवडणूक ही विशेष आकर्षण ठरली. ही निवडणूक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे (ईव्हीएम) पार पडली. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया, मतदानाचे महत्त्व आणि लोकशाही पद्धतीचा अनुभव घेता आला. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून निवडणूक प्रक्रिया अधिक सुसंघटित, पारदर्शक आणि कार्यक्षम पद्धतीने कशी राबविता येते, याची जाणीवही विद्यार्थ्यांना या उपक्रमातून झाली. त्यानंतर नवनिर्वाचित विद्यार्थी परिषद सदस्यांची घोषणा व परिचय करण्यात आला. विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना त्यांच्या नवीन जबाबदाऱ्यांसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या निवडणुकीच्या यशस्वी आयोजनासाठी निवडणूक कल्पेश लांगी यांनी मेहनत घेतली.




## 'चूजिंग गोल्ड' आत्मचरित्र प्रकाशित

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या जीवनप्रवासावर आधारित चूजिंग गोल्ड या आत्मचरित्राचे प्रकाशन झाले. पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने प्रकाशित केलेल्या या पुस्तकातून १९४ वर्षांचा व्यावसायिक वारसा तरुण वयात स्वीकारल्यानंतर डॉ. गाडगीळ यांनी अनुभवलेले संघर्ष, आव्हाने, आणि नेतृत्वाचा प्रवास उलगडला आहे. सहाव्या पिढीतील उद्योजक असलेल्या डॉ. गाडगीळ यांनी पुस्तकात आजोबा व आईसोबतचे संवाद, आयुष्यातील महत्त्वाचे टप्पे, अपयश, आत्मसंशय आणि कठीण प्रसंगी घेतलेले निर्णय यांचा प्रामाणिकपणे वेध घेतला आहे. परंपरेचा सन्मान राखत स्वतःचा स्वतंत्र मार्ग निर्माण करण्याचा प्रवास या आत्मचरित्राचा केंद्रबिंदू आहे. या पुस्तकाच्या निमित्ताने पहिल्यांदाच स्वतःशी संवाद साधण्याची संधी मिळाली. कोणत्या निर्णयांचा अभिमान आहे, कोणत्या निर्णयांची आजही खंत आहे, याचा प्रामाणिक लेखाजोखा या पुस्तकात मांडला आहे.

## नाग बनविण्याची लगबग

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

नागपंचमी सण येत्या १७ ऑगस्टला येत असून या नागपंचमी सणाच्या पार्श्वभूमीवर शहरासह ग्रामीण भागात सणाची उत्साहपूर्ण तयारी सुरू झाली आहे. यानिमित्ताने मुरूड बाजारपेठ येथील निल गोबरे हा छोट्या बालक मातीपासून नाग बनविण्यासाठी लगबग पाहायला मिळत आहे. नागाला आकार देताना त्यावर विविध रंगांची सजावट करण्यासाठीही बालकांमध्ये उत्साह दिसून येत आहे.

नागपंचमीच्या निमित्ताने या



उपक्रमातून बालकांना भारतीय संस्कृती व परंपरेची ओळख होत असून, पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करण्याचा संदेशही दिला जात आहे. मातीच्या नागाची पूजा करून नागदेवतेप्रती श्रद्धा व्यक्त करण्यासाठी बालकांची लगबग सुरू आहे.

## पालिकेला 'अमरधाम' नावाचा विसर

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

पनवेल शहराला स्वच्छ आणि सुंदर बनविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेकडून विविध ठिकाणच्या भिंतींवर लाखो रुपये खर्च करून आकर्षक चित्रे आणि संदेश साकारण्यात आले आहेत. मात्र, शरीराची अंतिम यात्रा ज्या ठिकाणी येऊन विसावते त्या पनवेलच्या अमरधाम स्मशानभूमीच्या प्रवेशद्वारावर अद्याप 'अमरधाम' हे नावच ठळकपणे लिहिलेले नसल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे.

शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी भिंती रंगविणे, विविध चित्रे साकारणे आणि



स्वच्छतेचे संदेश देणे यावर प्रशासनाचा भर आहे. मात्र, पनवेलमधील महत्त्वाच्या आणि संवेदनशील अशा अमरधाम स्मशानभूमीच्या प्रवेशद्वाराकडे प्रशासनाचे दुर्लक्ष का? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. अंत्यविधीसाठी प्रथमच या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांना प्रवेशद्वारावर स्मशानभूमीचे नाव स्पष्टपणे दिसावे, अशी अपेक्षा असते. मात्र, नावाचा फलक अथवा ठळक अक्षरांमध्ये नामफलक नसल्याने अमरधाम स्मशानभूमीची जागा बदलण्याचा पालिकेचा मानस आहे का? शहराच्या विविध भागांत सौंदर्यीकरणासाठी निधी खर्च केला जात असताना, अंतिम संस्काराच्या या महत्त्वाच्या ठिकाणी साधे नाव लिहिण्यासाठी प्रशासनाला वेळ का मिळत नाही? असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. महापालिकेने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन अमरधामच्या प्रवेशद्वारावर सुस्पष्ट, आकर्षक आणि कायमस्वरूपी नामफलक लावावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### प्रचंड धुक्यामुळे अपघात होण्याची शक्यता | तीन ते चार हजार पर्यटक वर्षासहलीसाठी

## माथेरान घाटातून धोकादायक वाहतूक सुरु

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ माथेरान घाटात प्रचंड प्रमाणात वनराई आहे. उंचावर वसलेल्या माथेरान घाटात पावसाळ्यात प्रचंड धुके असते आणि त्यातून वाहनचालक वाट काढीत वाहनचालक आपली गाडी चालवत असतात. पर्यटन स्थळ असलेल्या माथेरानमध्ये खासगी गाडी घेऊन येणारे वाहनचालकांसाठी माथेरान घाटरस्त्यातील धुके आव्हान देणारे ठरत आहे. धुक्याची दुलई अनुभवण्यासाठी माथेरान हजारोंचे संख्येने पर्यटक येत असतात.

माथेरान या थंड हवेच्या



ठिकाणी तेथील पावसाचा आनंद घेण्यासाठी पावसाळ्यातील चार महिने किमान तीन लाख लाख पर्यटक येत असतात.

सध्या दररोज तीन ते चार हजार पर्यटक वर्षासहलीसाठी माथेरान येथे येत आहेत. तर शनिवार-रविवारी हि संख्या २० हजाराच्या पुढे जाते. त्यामुळे पावसाळ्यात माथेरानचे पर्यटन फुलले आहे. पण माथेरान या ठिकाणी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटनाना नेरळ माथेरान घाटरस्त्याने प्रवास करताना दिसून येत आहेत.

माथेरान या ठिकाणी जाण्यासाठी घाटरस्ता हा एकमेव रस्ता असून या रस्त्याने वाहनांसाठी घाटरस्त्यातील धुके वाहनचालक यांच्यासाठी आव्हानातम्क प्रवास करणारे ठरत आहे. या घाटातून प्रवास करताना जुम्मापट्टी धबधबा पासून मोठ्या प्रमाणात धुक्यातून वाहनांना लागते. त्यावेळी काही मीटर अंतरावरील गाडी देखील वाहनचालक यांना दिसत नाही. त्यामुळे गाडीचे हेडलाईट सुरु ठेवून आणि साईड लाईट यांच्या आधारे वाहतूक करावी लागत आहे. या घाटातून काही वाहनचालक यांच्यासाठी मजेशीर प्रवास सुरु असून धुक्यातून वाहने चालवण्याची मजा पर्यटक देखील घेत आहेत. तर सायंकाळी सहा नंतर पूर्ण रात्र घाटात असलेले धुके वाहनचालकांची परीक्षा पाहणारे असते.

### पोलिसांकडून सूचना

रात्रीचा अंधार आणि धुक्यामुळे वाहनचालकांसाठी नेरळ माथेरान घाटरस्त्यातील प्रवास आव्हानातम्क ठरत आहेत. दुचाकीचालक यांच्यासाठी रात्रीच्या वेळी वाहने चालवू नयेत अशा सूचना पोलिसांकडून दिल्या जात आहेत. मात्र पर्यटकांनाकडून पोलिसांच्या सूचनाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसून येत आहे.

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


NOTICE OF INQUIRY
(FORM No. 2)
(नमुना क्र. २)
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी
कार्यालय रायगड, विभाग रायगड
(चौकशी नोटीस)

जा.क्र.न्यायशाखा/१४४६/२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
मालमत्ता क्रमांक ६२५, मारूती मंदिराजवळ
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड
दि. ७/८/२६

(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम सन १९५० चे कलम २२)
चौकशी अर्ज क्र. ५५९/२०२६

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम श्री. मुयधन सेवा समिती कळंबोली
न्यास नोंदणी क्र. एफ-१२५६६/रायगड
श्री. Mr. Shanil Babu A.V. ... अर्जदार
रा. Flat No. 502, Krishna Leela CHS. LTD.
Plot No. 19 Sector-10
Kalamboli Tal- Panvel, Dist-Raigad
कलम २२ अन्वये केलेला अर्ज
कलम २२ अन्वये भरलेला नमुना यांच्या संबंधात
श्री. Mr. Rajan Nambiar
रा. FLat No. 3 sector- 8 E
Kalmboli Navi Mumbai ... गैर अर्जदार
Panvel Dist- Raigad-

ज्याअर्थी खाली सही करणार यांजकडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थे संबंधात कलम २२ अन्वये दाखल केलेला अर्ज

त्याअर्थी तुम्हास ही नोटीस देण्यात येते आहे आणि फर्मविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रितीने सूचना दिलेल्या वकीला मार्फत खाली सही करणार यांचे समोर व दिलेल्या पत्यावर तारीख ०८/०९/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता वरील बाबींचा अखेरचा निकाल करणेसाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर राहावे आणि चौकशी संबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्या संबंधीचा तोंडी व दस्तऐवजाचा रूपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे.

आज दिनांक : ५/८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व सहाय्यक धर्मादाय आयुक्तांच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग रायगड

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. अंकुश काळुराम पाटील यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे गौळवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २४/६ एकुण ०.१९.०० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १०/०८/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## अलिबाग को-ऑप. अर्बन बँक लि.

**अलिबाग-रायगड.**
**६३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**
**(फक्त सभासदांकरिता)**

अलिबाग को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. च्या सर्व सभासदांस सूचना देण्यात येते की, अलिबाग को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. ची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २९/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटी, सेंन्ट्रल ऑफीस, वेश्वी, अलिबाग येथील सभागृहात बँकेच्या अध्यक्षा मा. सौ. सुप्रिया जयंत पाटील यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. सभेपुढे पुढील विषयांचे कामकाज होणार आहे. तरी सर्व सभासदांनी सदर सभेस सहभागी व्हावे अशी नम्र विनंती आहे.

**-: सभेपुढील विषय :-**

१) मागील दिनांक २०/०८/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) मा. संचालक मंडळाने वैधानिक लेखापरिक्षक यांचे लेखापरिक्षण अहवालासह सादर केलेली सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाची ताळेबंद व नफा तोटा पत्रके स्वीकृत करणे.
३) सन २०२५-२०२६ सालचा अहवाल वाचून मंजुरी देणे व संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०२४-२०२५ च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष-दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
५) सन २०२६-२०२७ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षक यांच्या नेमणुकीस मान्यता देणे व त्यांची ऑडीट फी ठरविणे.
६) सन २०२५-२०२६ चे अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२६-२०२७ करीता मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व प्रगती तक्त्याची माहिती घेणे.
७) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत/कंकरंट हिशोब तपासणीस यांची नेमणुक करणे.
८) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
९) एक रक्कमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत बंद केलेल्या कर्ज खात्यास मंजुरी देणे.
१०) मा.संचालक मंडळ सभेपुढे ठेवेल अशा कामांचा विचार करणे.
११) सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा क्षमापित करणे.
१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळेच्या विषयांवर विचार करणे.

अलिबाग
दिनांक : २४/०७/२०२६

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
सही /-
**(बी.सी.मोरे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सूचना :**
१)ज्या सभासदांना काही सूचना करावयाच्या असतील अगर प्रश्न विचारायचे असतील त्यांनी आपल्या सूचना किंवा प्रश्न सभेच्या तारखेच्या सात दिवस अगोदर बँकेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी पाठवाव्यात.
२)गणसंख्येच्या (कोरम) अभावी सभा तहकूब करावी लागल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर भरेल. सदर सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
३) या सभेची नोटीस बँकेच्या सर्व शाखांमध्ये लावण्यात आलेली आहे तसेच वार्षिक अहवालाच्या प्रती वाचण्यासाठी ठेवण्यात आलेल्या आहेत.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक प्रिया प्रविण भोईर यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ९१ | ६ | ०-४२-०० | ०-३९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ११/०८/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे टेंभोर्डे ता.मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक मकरंद गुलाबराव सोनावणे, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/ गहाण इ.स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे टेंभोर्डे, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| टेंभोर्डे ता.मुरुड | ७४ | क्षेत्र ०-७६-१०<br>पो.ख. ०-०२-८०<br>एकुण क्षेत्र ०-७८-९० | १७.९८ |

वर नमुद मिळकतीमधील खाते क्र.१३७ क्षेत्र ०-२६-०० हे.आर., आकार ६.१४ रु.पैसे या मिळकतीमधील मकरंद गुलाबराव सोनवणे यांचा असलेल्या अविभाज्य हिश्याबाबत

दिनांक : ११/०८/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. रामचंद्र बाळु सावंत, श्री.बबन वाळकु सावंत, श्री.संतोष वाळकु सावंत, श्री.काळूराम वाळकु सावंत यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे कामतपाडा, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २४/४/ब यांचे एकुण क्षेत्र ०.५५.०० गुंठे, तसेच सर्व्हे नं २२/२/ब यांचे एकुण क्षेत्र १.१८.५० गुंठे मिळकत विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १०/०८/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे जिते, ता.पेण जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्वेता सोनकुमार येलगडी, सोनकुमार कृष्णा येलगडी, धार्मिक सोनकुमार येलगडी, अर्जुन सोनकुमार येलगडी यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. निशांत बाबुराव नाईकडे, श्री. जानु रामा माळी व सुनिता शिवाजी धामणे यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./ गट नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| जिते | ८७/१५/अ | ०.०६.७०<br>पो.ख. ०.००.००<br>एकूणक्षेत्र ०.०६.७० | ०.३६ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकती मध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही /-
ठिकाण: पेण
दि. ११/०८/२०२६

**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशनजवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं.९८२२०३०३८९

SARASWATI EDUCATION SOCIETY'S
## YADAVRAO TASGAONKAR POLYTECHNIC
Approved by AICTE & DTE, Affiliated to MSBTE, Mumbai
At. Chandhai, Post-Nasrapur, Tal: Karjat, Dist: Raigad, Pin code: 410201
www.ytpolytechnic.com, principal.ytp@tasgaonkartech.com

**ADMISSION NOTIFICATION against Cap Vacancy (ACAP)**

**Applications are invited for Admission to First Year Diploma in Engineering (DEN) Against Cap Vacancy (ACAP) for various courses for academic year 2026-27.**

| Sr. No | Name of Course | Course Code | Vacant Seats |
|---|---|---|---|
| 1 | Civil Engineering | 328219110 | 37 |
| 2 | Computer Engineering | 328224510 | 46 |
| 3 | Electrical Engineering | 328229310 | 02 |
| 4 | Information Technology | 328224610 | 48 |
| 5 | Mechanical Engineering | 328261210 | 30 |
| 6 | Artificial Intelligence (AI) and Machine Learning | 328299810 | 16 |

The schedule of admission procedure is as follows,
1) Issue of application form, Admission Form & Information Brochure at Office: **09.00 am to 03.00 pm from 09th of August 2026 to 11th of August 2026.**
2) Submission of Completely filled application form: **10.00 am to 4.00 pm from 09th of August 2026 to 11th of August 2026.**
3) Display of Provisional Merit List on Notice Board and Institute Website: **05.00 pm on 11th August 2026.**
4) Reporting to the Institute by submitting completely filled admission form with relevant documents: **10.00 am to 05.00 pm from 12th of August 2026 to 14th of August 2026.**
5) Cost of Information Brochure with Admission form: **INR 200/- only.**

For any queries contact to **8149679293 / 7030896095**

Sd/
Principal

SARASWATI EDUCATION SOCIETY'S
## YADAVRAO TASGAONKAR POLYTECHNIC
Approved by AICTE & DTE, Affiliated to MSBTE, Mumbai
At. Chandhai, Post-Nasrapur, Tal: Karjat, Dist: Raigad, Pin code: 410201
www.ytpolytechnic.com, principal.ytp@tasgaonkartech.com

**ADMISSION NOTIFICATION against Cap Vacancy (ACAP)**

**Applications are invited for Admission to Direct Second Year Diploma in Engineering (DSD) Against Cap Vacancy (ACAP) for various courses for academic year 2026-27.**

| Sr. No | Name of Course | Course Code | Vacant Seats |
|---|---|---|---|
| 1 | Civil Engineering | 328219110 | 19 |
| 2 | Computer Engineering | 328224510 | 15 |
| 3 | Information Technology | 328224610 | 05 |

The schedule of admission procedure is as follows,
1) Issue of application form, Admission Form & Information Brochure at Office: **09.00 am to 03.00 pm from 11th of August 2026 to 12th of August 2026.**
2) Submission of Completely filled application form: **10.00 am to 4.00 pm from 11th of August 2026 to 12th of August 2026.**
3) Display of Provisional Merit List on Notice Board and Institute Website: **05.00 pm on 12th August 2026.**
4) Reporting to the Institute by submitting completely filled admission form with relevant documents: **10.00 am to 05.00 pm from 13th of August 2026 to 14th of August 2026.**
5) Cost of Information Brochure with Admission form: **INR 200/- only.**

For any queries contact to **8149679293 / 7030896095**

Sd/
Principal
Yadavrao Tasgaonkar Polytechnic

NOTICE OF INQUIRY
(FORM No. 2)
(नमुना क्र. २)
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी
कार्यालय रायगड, विभाग रायगड
(चौकशी नोटीस)

जा.क्र.न्यायशाखा/१४४५/२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
मालमत्ता क्रमांक ६२५, मारूती मंदिराजवळ
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड
दि. ७/८/२६

(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम सन १९५० चे कलम २२)
चौकशी अर्ज क्र. ५६२/२०२५

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम श्री. मुयधन सेवा समिती कळंबोली
न्यास नोंदणी क्र. एफ-१२५६६/रायगड
श्री. Mr. Shanil Babu A.V. ... अर्जदार
रा. Flat No. 502, Krishna Leela CHS. LTD.
Plot No. 18 Sector-10
Kalamboli Tal- Panvel, Dist-Raigad
कलम २२ अन्वये केलेला अर्ज
कलम २२ अन्वये भरलेला नमुना यांच्या संबंधात
श्री. Mr. Sadandan m.c
रा. KL 514/2 sector- 3 E
Kalmboli Navi Mumbai ... गैर अर्जदार
Panvel Dist- Raigad-410218

ज्याअर्थी खाली सही करणार यांजकडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थे संबंधात कलम २२ अन्वये दाखल केलेला अर्ज

त्याअर्थी तुम्हासही नोटीस देण्यात येते आहे आणि फर्मविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रितीने सूचना दिलेल्या वकीला मार्फत खाली सही करणार यांचे समोर व दिलेल्या पत्यावर तारीख ०८/०९/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता वरील बाबींचा अखेरचा निकाल करणेसाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर राहावे आणि चौकशी संबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्या संबंधीचा तोंडी व दस्तऐवजाचा रूपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे.

आज दिनांक : ५/८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व सहाय्यक धर्मादाय आयुक्तांच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग रायगड

## कमळ नागरी सह.पतसंस्था मर्यादित, अलिबाग

रजि.नं.आर.जी.डी./ए.बी.जी.आर.एस.आर./सी.आर./३०८/दि.१८/०३/१९९२

**३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**
**फक्त सभासदांसाठी**

दि. १२/०८/२०२६

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग या संस्थेच्या सभासदांची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २९ ऑगस्ट २०२६ रोजी, क्षात्रैक्य समाज हॉल, कुरूळ, अलिबाग येथे सायंकाळी ४.३० वाजता संस्थेच्या कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाजासंबंधी विचार करण्यासाठी होणार आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सदर सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेची कार्यक्रम पत्रिका**

१. संस्थेच्या दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि.३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल सादर करणे व तो स्विकृत करणे.
३. संस्थेचे सन २०२५-२६ चे ताळेबंद व नफातोटा पत्रक स्वीकृत करणे.
४. मा.वैधानिक लेखापरिक्षक यांचा सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या शासकीय हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेवून तो स्वीकारणे.
५. मा. वैधानिक लेखापरिक्षक यांचे कडील सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण हिशोब तपासणी दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
६. व्यवस्थापन समितीने शिफारस केलेल्या दि. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या नफा वाटणी प्रस्तावास मान्यता देणे व लाभांश जाहिर करणे.
७. मा.संचालक मंडळाने सन २०२६-२०२७ करिता शिफारस केलेल्या शासनमान्य नामतालिकेतील वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे व त्यांना शासन नियमानुसार मेहनताना देणेबाबत मंजुरी देणे.
८. सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे तसेच सन २०२५-२६ चे अंदाज पत्रकापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मान्यता देणे.
९. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांचे कर्जासंबंधीच्या माहितीची नोंद घेणे.
१०. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात शासनमान्य एकरक्कमी कर्ज योजनेंतर्गत सवलत दिलेल्या कर्ज रक्कमांचा आढावा घेऊन तत्संबधित संचालक मंडळाच्या निर्णयाची नोंद घेणे.
११.म.स.सं अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील नियम ४९ मधील तरतुदीनुसार संस्थेचा वसुलीचा हक्क अबाधित ठेवून मा. वैधानिक लेखापरिक्षक यांनी प्रमाणित केलेली वसूल न होणारी थकीत कर्जखाती निर्लेखित करणेस मान्यता देणे.
१२. नवीन सामाजिक बांधिलकी समिती गठीत करणे व सन २०२५ ते २०२६ या आर्थिक वर्षातील सामाजिक बांधिलकी निधी समितीच्या इतिवृत्ताची नोंद घेणे.
१३. संस्थेने खरेदी केलेल्या मालमत्तेच्या व्यवहाराची नोंद घेणे.
१४. संस्थेने खरेदी केलेल्या मिळकतीवर कार्यालय उभारण्यासाठी व्यवस्थापक समितीने नियुक्त केलेल्या वास्तुविशारद यांनी सादर केलेल्या आराखड्याची नोंद घेणे.
१५. दैनंदिन कामकाजाच्या अनुषंगाने विविध धोरणास मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.
१६. मा.अध्यक्षांचे परवानगीने आयत्यावेळेचे विषयांवर चर्चा करणे.

सभा: शनिवार, दि.२९ ऑगस्ट २०२६,
सायंकाळी ४:३० वाजता
स्थान:क्षात्रैक्य समाज हॉल, कुरूळ, अलिबाग

**मा.संचालक मंडळाच्या अनुज्ञेने**
**श्री.लक्ष्मण सोनाजी जुंधारे**
**सेक्रेटरी**

**विशेष सूचना-**
१. संस्थेच्या पोटनियमाप्रमाणे सभेसाठी आवश्यक असणाऱ्या गणसंख्येच्या (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी पूर्व घोषित वेळेनंतर अर्ध्या तासाने सदरची सभा घेतली जाईल व त्या सभेस गणसंख्येचे (कोरमचे) बंधन असणार नाही.
२. ज्या सभासदांना सभेच्या विषयांबाबत प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि.२२/०८/२०२६ पर्यंत मध्यवर्ती कार्यालय अथवा शाखेच्या कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात अर्ज द्यावेत व अर्जामध्ये सभासद क्रमांक व संपूर्ण नाव नमूद करून पाठवावेत. सभेच्या विषय पत्रिकेतील विषयांबाबतचे प्रश्न विचारात घेतले जातील.
३. वार्षिक सर्वसाधारण सभेची सविस्तर नोटीस व दि. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेचा ताळेबंद, नफातोटा पत्रक व वार्षिक अहवालाची संपूर्ण माहिती मुख्यालयासह सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर व स्थानिक वर्तमानपत्रात तसेच संस्थेच्या वेबसाईट https://www.kamalpatsanstha.in वर सभासदांच्या माहितीसाठी प्रसिद्ध केली आहे.
४. सभासदांनी आपल्या पत्त्यात बदल झाला असल्यास तसेच संपर्क, दूरध्वनी अथवा मोबाईल क्रमांक तसेच के.वाय.सी. कागदपत्रे याची अद्ययावत माहिती संस्थेस द्यावी. तसेच नामांकन सुविधा केली असल्याची खात्री करावी.
५. सन्माननीय सभासदांनी सभेस येताना कृपया आपला फोटो ओळखपत्राचा पुरावा (आधारकार्ड/पॅनकार्ड/मतदान कार्ड/बँक पासबुक/शासकीय ओळखपत्र) सोबत आणावे. त्याशिवाय सभेत प्रवेश दिला जाणार नाही.
६. पोस्ट / कुरिअर सेवेच्या विलंबामुळे सभेची सूचना वेळेत न मिळाल्यास हीच सभेची सूचना समजावी.
७. ज्या सभासदांना वार्षिक अहवालाची प्रत हवी असेल त्यांना ती संस्थेच्या मुख्य कार्यालयात तसेच संस्थेच्या शाखांमध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध असेल.

**✲ सभासदांसाठी महत्वाचे✲**

संस्थेच्या उपविधीमध्ये नमूद केलेप्रमाणे संस्थेच्या प्रत्येक सभासदाने सभासदत्वाकरिता रु.१००/- चे किमान १० भाग खरेदी करणे आवश्यक आहे.

संस्थेच्या काही सभासदांकडे रु.१००/- चे १० भागापेक्षा कमी भाग आहेत. संस्था उपविधीतील तरतुदीनुसार १० पेक्षा कमी भाग असणाऱ्या सभासदांचे सभासदत्व या कारणामुळे रद्द होवू शकते. सबब रु. १००/- चे १० पेक्षा कमी भाग असणाऱ्या सभासदांनी आपली भाग संख्या किमान रु. १००/- चे १० भाग दि. ३१/१२/२०२६ पर्यंत वाढवावी.

# वेस्ट इंडिजचा 'गेम ओव्हर'

■ विश्वचषकाची थेट पात्रता हुकली
■ सलग तिसऱ्यांदा भंगलं स्वप्न

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

वेस्ट इंडिजला एकदिवसीय विश्वचषकासाठी थेट पात्र होण्याची संधी पुन्हा एकदा हुकली आहे. दोन वेळच्या विश्वविजेत्या संघाला आता २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकात स्थान मिळवण्यासाठी पात्रता फेरीतून जावे लागणार आहे. ही सलग तिसरी विश्वचषक फेरी आहे, ज्यात वेस्ट इंडिज थेट पात्रतेतून बाहेर पडला आहे. आयर्लंडविरुद्ध सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील दुसऱ्या सामन्यात अफगाणिस्तानच्या विजयानंतर वेस्ट इंडिजला धक्का बसला. या विजयामुळे थेट पात्रतेच्या शर्यतीत अफगाणिस्तानचे स्थान अधिक मजबूत झाले.



नामिबिया, दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वे हे तिन्ही देश २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाचे सहआयोजन करतील. सह-यजमान म्हणून दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वे यांना थेट प्रवेश मिळेल. या व्यतिरिक्त, आयसीसी एकदिवसीय क्रमवारीच्या आधारावर आठ संघांना विश्वचषकात थेट प्रवेश मिळेल. थेट पात्रतेसाठी क्रमवारीची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०२६ आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेनंतर, वेस्ट इंडिज ७३ गुणांसह १० व्या स्थानावर घसरला होता. अफगाणिस्तान ९० गुणांसह ७ व्या स्थानावर होता.

२०१९ च्या एकदिवसीय विश्वचषकासाठी वेस्ट इंडिज थेट पात्र ठरू शकला नाही आणि स्पर्धेत स्थान मिळवण्यासाठी त्यांना पात्रता फेरीत खेळावी लागली. चार वर्षांनंतर, २०२३ च्या विश्वचषकात संघाला आणखी मोठा धक्का बसला. वेस्ट इंडिज पात्रता फेरीतच बाहेर पडला आणि मुख्य स्पर्धेसाठी पात्र ठरू शकला नाही. झिम्बाब्वेमध्ये खेळल्या गेलेल्या पात्रता फेरीच्या सुपर सिक्स टप्प्यात झिम्बाब्वे आणि नेदरलँड्सकडून झालेल्या पराभवांनी त्यांच्या अडचणी आणखी वाढवल्या. त्यानंतर स्कॉटलंडकडून झालेल्या पराभवांनी विश्वचषकातून वेस्ट इंडिज विश्वचषकसाठी पात्र ठरु शकला नाही. आता, विश्वचषकात स्थान निश्चित करण्यासाठी संघ पुन्हा एकदा पात्रता फेरीत खेळण्याच्या स्थितीत आहे.

अफगाणिस्तान आणि आयर्लंड यांच्यातील मालिका वेस्ट इंडिजसाठी अत्यंत महत्त्वाची होती. थेट पात्रतेच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी आयर्लंडला दमदार कामगिरी करायची होती. पाच सामन्यांच्या मालिकेत त्यांना ५-० ने विजय मिळवणे आवश्यक होते. मात्र, पहिला एकदिवसीय सामना पावसामुळे रद्द झाला, ज्यामुळे आयर्लंडच्या आशा जवळजवळ संपुष्टात आल्या. त्यानंतर अफगाणिस्तानने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात आयर्लंडचा ९२ धावांनी पराभव केला. या विजयामुळे अफगाणिस्तानची स्थिती अधिक मजबूत झाली आणि वेस्ट इंडिजच्या थेट पात्रतेची संधी जवळजवळ संपुष्टात आली.

वेस्ट इंडिज सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस भारताविरुद्ध तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळणार आहे. पहिला सामना २७ सप्टेंबरला, दुसरा ३० सप्टेंबरला आणि तिसरा ३ ऑक्टोबरला खेळला जाईल. परंतु, वेस्ट इंडिजने ही मालिका ३-० ने जिंकली तरीही, थेट पात्रतेचे समीकरण त्यांच्या बाजूने बदलणार नाही. त्यामुळे त्यांना आता पात्रता फेरीच्या माध्यमातून २०२७ च्या विश्वचषकातील स्थानासाठी तयारी करावी लागेल.

## निवडक




### सरफराज खानचे टीम इंडियात कमबॅक

**पुणे :** श्रीलंकेविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेआधी भारतीय क्रिकेट संघात बदल झाला आहे. बुमराहच्या अनुपस्थितीनंतर, साई सुदर्शनलाही या दौऱ्यातून वगळण्यात आले आहे. वृत्तानुसार, सुदर्शन दुखापतीतून पूर्णपणे बरा न झाल्यामुळे या मालिकेत खेळू शकणार नाही. बीसीसीआयने त्याच्या जागी सरफराज खानची निवड केली आहे. तो लवकरच कोलंबो येथे भारतीय संघात सामील होईल. एकीकडे देवदत्त पडिक्कलने शतक ठोकून आपली दावेदारी मजबूत केली तर सरफराजच्या समावेशामुळे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यासमोर गॉल कसोटीसाठी अंतिम अकरा खेळाडू निवडण्याचे मोठे आव्हान असणार आहे.रविवारी, ९ ऑगस्ट रोजी भारत आणि श्रीलंका क्रिकेट इलेव्हन यांच्यातील सराव सामना संपल्यानंतर लगेचच बीसीसीआयने या बदली खेळाडूची घोषणा केली. बीसीसीआयने म्हटले आहे की, सुदर्शनला उजव्या पायाला स्ट्रेस फ्रॅक्चर झाला असून तो दुखापतीतून पूर्णपणे बरा झालेला नाही. सध्या बंगळूरु येथील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये वैद्यकीय पथकाकडून त्याच्या प्रकृतीवर लक्ष ठेवले जात आहे. मंडळाने स्पष्ट केले की, प्रकृतीत सुधारणा होऊनही सुदर्शन कसोटी मालिकेत सहभागी होऊ शकणार नाही आणि म्हणूनच निवड समितीने सरफराज खानची निवड केली आहे.




### पडिक्कलचं शतक अन् गोलंदाजांचा कहर

**नवी दिल्ली :** भारत आणि श्रीलंका यांच्यातील तीन दिवसाच्या सराव सामन्याला ७ ऑगस्ट रोजी सुरुवात झाली. कोलंबो येथील क्रिकेट क्लब मैदानावर खेळल्या गेलेल्या सामन्यात भारताने श्रीलंकेचा ६ विकेट्सने धुव्वा उडवला. भारतीय क्रिकेट संघाने उत्कृष्ट कामगिरी करत श्रीलंका क्रिकेट इलेव्हनवर दणदणीत विजय मिळवला. श्रीलंकेने २०० धावांवर आपला डाव घोषित करून पाहुण्या संघासमोर २०७ धावांचे लक्ष्य ठेवले. भारताने हे लक्ष्य गाठून सामना जिंकला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेल्या श्रीलंका क्रिकेट इलेव्हनने दमदार सुरुवात केली. श्रीलंका क्रिकेट इलेव्हनने ९० षटकांत आठ विकेट्स गमावून ३६३ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला. भारताच्या डावाची सुरुवात चांगली झाली नाही. भारताने ९० षटकांत ६ विकेट्स गमावून ३५७ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला. दुसऱ्या डावात श्रीलंकेने ४५ षटकांत ६ विकेट्स गमावून २०० धावा केल्या आणि आपला दुसरा डाव घोषित केला. त्यांनी भारतासमोर विजयासाठी २०७ धावांचे लक्ष्य ठेवले.शुभमन गिलनेही ४४ धावांचे योगदान दिले. अखेरीस, वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने फलंदाजीत शानदार कामगिरी करत अवघ्या १५ चेंडूंमध्ये ४ षटकार आणि १ चौकाराच्या मदतीने नाबाद ३२ धावा ठोकल्या आणि ४५ षटकांत ४ विकेट्स गमावून २१४ धावा केल्या. हा सामना भारताने ६ विकेट्सने जिंकला.

### माहेश्वरीचा प्रेरणादायी प्रवास

**नागपूर :** ग्रामीण भागांतील खेळाडू विद्यार्थ्यांना मोठ्या संधी मिळत नाहीत, अशी ओरड होते. मात्र, माहेश्वरी भावरकरने आपल्या कर्तृत्वाने ही धारणा खोटी ठरवली आहे. योग्य मार्गदर्शन, कठोर परिश्रम व आत्मविश्वासाच्या जोरावर खेडेगावातील मुलगीही जागतिक स्पर्धेपर्यंत पोहोचू शकते, हे तिने सिद्ध करून दाखविले.



ही संघर्षपूर्ण व तितकीच प्रेरणादायी कहाणी आहे वर्धा जिल्ह्यातील आंजी या गावातील युवा महिला व्हॉलीबॉलपटू माहेश्वरी भावरकरची. गावातील आदर्श विद्यालयामध्ये इयत्ता दहावीत शिकणाऱ्या माहेश्वरीला लहानपणापासूनच खेळाची आवड होती. त्यामुळे तिने करिअरसाठी क्रिकेटसारख्या ग्लॅमरस खेळाऐवजी देशी खेळ असलेल्या व्हॉलीबॉलला पसंती दिली. अवघ्या बारा वर्षांची असताना मैदानावर पाऊल ठेवल्यानंतर तालुका, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर यशाच्या एकेक पायऱ्या चढत तिने थेट जागतिक पातळी गाठली. वाराणसी व रायबरेली येथे झालेल्या विविध राष्ट्रीय स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी बजावल्यानंतर निवड समितीचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. माहेश्वरीला आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा महासंघाच्या वतीने चीनमध्ये नुकत्याच पार पडलेल्या जागतिक शालेय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. या स्पर्धेत भारताला पदक जिंकता आले नाही, मात्र संघाने उपांत्यपूर्वफेरीपर्यंत मजल मारली.

### दुखापतीमुळे जेमिमा मालिकेतून बाहेर

**नवी दिल्ली:** भारताची स्टार फलंदाज जेमिमा रॉड्रिग्ज मांडीचे स्नायू दुखावल्यामुळे हॅमस्ट्रिंग सध्या सुरू असलेल्या द हंड्रेड या क्रिकेट मालिकेतून बाहेर पडली आहे. सदर्न ब्रेव्ह संघाकडून खेळताना झालेल्या या दुखापतीमुळे आगामी महिला टी-२० आशिया चषक स्पर्धेतील तिच्या सहभागावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सदर्न ब्रेव्ह संघाने शनिवारी दिलेल्या माहितीनुसार, स्पर्धेच्या उर्वरित सामन्यांसाठी जेमिमाच्या जागी ऑस्ट्रेलियाची अष्टपैलू खेळाडू चार्ली नॉट हिचा संघात समावेश करण्यात आला आहे. जेमिमा रॉड्रिग्जला झालेल्या दुखापतीमुळे उर्वरित सामन्यांसाठी चार्ली नॉटला करारबद्ध करण्यात आल्याची आम्ही पुष्टी करतो. जेमिमा लवकर बरी व्हावी यासाठी शुभेच्छा, असे सदर्न ब्रेव्ह संघाने एक्सवर स्पष्ट केले. २५ वर्षीय जेमिमाने या मोसमात सदर्न ब्रेव्ह संघासाठी सहा डावांत ३५.७५ च्या सरासरीने आणि १३१.१९ च्या स्ट्राइक रेटने १४३ धावा केल्या आहेत.





## बालचित्रकला स्पर्धेला सर एस. ए. हायस्कूलचा उत्स्फूर्त प्रतिसाद

| आगरदांडा | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित बालचित्रकला स्पर्धेमध्ये सर एस. ए. हायस्कूल व स्व. म. ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालय, मुरुड-जंजिरा येथील तब्बल १०९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या स्पर्धेत इयत्ता ५ वी ते ७ वी तसेच इयत्ता ८ वी ते १० वी अशा दोन गटांमध्ये विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आपल्या कलागुणांचे सुंदर प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांनी कल्पकता, निरीक्षणशक्ती व सर्जनशीलतेचा सुरेख आविष्कार आपल्या चित्रांमधून साकारला. विद्यार्थ्यांच्या या उत्स्फूर्त सहभागाबद्दल अध्यक्ष, मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## कॅनडीयन ओपनमध्ये मोठा उलटफेर

**अलेक्झांड्रोव्हाचा गेमचेंजर विजय; सबालेन्काला नमवत क्वार्टर फायनलमध्ये धडक**

| मुंबई | वृत्तसंस्था |

कॅनडीयन ओपनमध्ये मोठा उलटफेर पाहायला मिळाला. रशियाची १९व्या क्रमांकाची खेळाडू, एकातेरिना अलेक्झांड्रोव्हाने, जागतिक क्रमवारीत अव्वल आणि चार वेळची ग्रँड स्लॅम विजेती आर्यना सबालेन्काला एका रोमांचक पराभूत केले.या तीन-सेटच्या सामन्यात अलेक्झांड्रोव्हाने पराभूत करून उपांत्यपूर्व फेरी गाठली. जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या खेळाडूविरुद्ध अलेक्झांड्रोव्हाचा हा तिसरा विजय आहे. यापूर्वी तिने मियामी २०२४ मध्ये इगा स्वियातेक आणि दोहा २०२५ मध्ये सबालेन्काला पराभूत केले होते.



दोन्ही खेळाडूंमध्ये चुरशीची स्पर्धा पाहायला मिळाली. पहिल्या सेटमध्ये अलेक्झांड्रोव्हा आणि सबालेन्काने प्रत्येकी तीन वेळा एकमेकींची सर्व्हिस ब्रेक केली. यानंतर, अलेक्झांड्रोव्हाने टाय-ब्रेकर ७-३ ने जिंकून पहिला सेट आपल्या नावावर केला. दुसऱ्या सेटमध्ये सबालेन्काने जोरदार पुनरागमन केले. सेटमध्ये मिळालेल्या एकमेव ब्रेक पॉइंटचा फायदा घेत तिने तो सेट ६-४ ने जिंकून सामना बरोबरीत आणला.

दोन्ही खेळाडूंमधील चुरशीची लढत तिसऱ्या सेटमध्येही सुरू राहिली. दोघींनीही अनेक वेळा एकमेकींची सर्व्हिस ब्रेक केली. परंतु, अलेक्झांड्रोव्हाने महत्त्वाच्या क्षणी आपला संयम राखला आणि ५-४ अशा स्थितीत सामन्यात टिकून राहण्यासाठी सबालेन्काला सर्व्हिस करावी लागली. सबालेन्काने दोन ब्रेक पॉइंट्स आणि एक मॅच पॉइंट वाचवला, पण अलेक्झांड्रोव्हाने तिसऱ्या मॅच पॉइंटवर सामना जिंकला. ही अलेक्झांड्रोव्हाची सहावी डब्ल्यूटीए १००० उपांत्यपूर्व फेरी असेल.

दुसऱ्या सामन्यात, युक्रेनच्या एलिना स्वितोलिनाने अमांडा अनिसिमोव्हाचा ६-२, ६-४ असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. शनिवारी यापूर्वी, दोन वेळची एनबीए चॅम्पियन जेसिका पेगुलाला १५ व्या मानांकित डायना श्नायडरने सरळ सेट्समध्ये ६-३, ६-३ असे हरवून मोठा धक्का दिला.

**डेव्हिस चषक टेनिस स्पर्धा; दोन तुल्यबळ संघांमध्ये चुरस**

## भारतासमोर दक्षिण कोरियाचे आव्हान

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

डेव्हिस कप क्वालिफायरच्या दुसऱ्या फेरीत दक्षिण कोरियाने भारताचे यजमानपद स्वीकारले असून ही लढत सेऊल येथील ऑलिम्पिक टेनिस सेंटरमध्ये हार्डकोर्टवर रंगणार आहे.१८ आणि १९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या या सामन्यात दोन तुल्यबळ संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

सध्या डेव्हिस कप क्रमवारीत भारत १९ व्या तर दक्षिण कोरिया १६ व्या स्थानावर आहे. परस्पर सामन्यांच्या नोंदीत कोरियाकडे ६-५ अशी किरकोळ आघाडी आहे. या महत्त्वपूर्ण लढतीसाठी भारतीय संघाची निवड १० ऑगस्ट रोजी करण्यात येणार आहे.

या दोन्ही देशांमध्ये आठ वर्षांनंतर सामना होत आहे. यापूर्वी २०१६ मध्ये चंडीगड येथे हिरवळीवर खेळवलेल्या आशिय / ओशनिया गट-१ च्या लढतीत भारताने ४-१ असा विजय मिळवला होता.

कोरियन खेळाडू सहसा हार्डकोर्ट खेळण्यास अधिक पसंती दर्शवतात, म्हणूनच गेल्या वेळी भारताने ग्रास कोर्टची निवड केली होती.

भारताने फेब्रुवारी महिन्यात बंगळुरू येथे नेदरलँड्सवर ३-२ अशी नाट्यमय मात केली होती.

**भारत पहिल्यांदाच दुसऱ्या फेरीत**

२०१९ मध्ये सध्याचे स्वरूप लागू झाल्यापासून भारताने पहिल्यांदाच क्वालिफायरच्या दुसऱ्या फेरीत धडक मारली आहे. ही दुसरी फेरी म्हणजे फायनल ८ मधील स्थानासाठी करो किंवा मरो अशी लढत असणार आहे.

यातील विजेता संघ नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या फायनल ८ मध्ये प्रवेश करेल. दक्षिण कोरियाने २०२२ आणि २०२३ मध्ये १६ संघांच्या डेव्हिस कप फायनल्समध्ये प्रवेश केला होता.

## पीएनपीच्या अभिषेक सिंहची दमदार कामगिरी

**दक्षिण विभागीय स्पर्धेतून राष्ट्रीय स्तरासाठी निवड**

| अलिबाग | प्रतिनिधी |

होली चाईल्ड सीबीएसई स्कूलच्या इयत्ता आठवीतील विद्यार्थी अभिषेक सिंह याने ॲथलेटिक्समध्ये उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.



शिर्डी येथील द्रोणा अकॅडमी येथे आयोजित सीबीएसई क्लस्टर-९ ॲथलेटिक्स मुला-मुलींच्या स्पर्धेत अभिषेकने १४ वर्षांखालील मुलांच्या गोळाफेक प्रकारात १०.५० मीटर अंतराची उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांकासह रौप्यपदक पटकावले.

या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर अभिषेकची सीबीएसई दक्षिण विभागीय ॲथलेटिक्स क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच दक्षिण विभागीय स्तरावरील कामगिरीच्या आधारे त्याची राष्ट्रीय स्तरावरील ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यामुळे अभिषेकच्या या यशाने शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीला नवी उंची मिळाली आहे. अभिषेकच्या मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाचे कौतुक करत शाळेच्या वतीने त्याचे अभिनंदन करण्यात आले. तसेच या नेत्रदीपक यशाबद्दल पी.एन.पी. संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी सातत्यपूर्ण प्रोत्साहन दिलेच पण त्याचे विशेष कौतुक देखील केले. अभिषेकच्या या उल्लेखनीय यशाबद्दल होली चाईल्ड सीबीएसई शाळेच्या मुख्याध्यापिका एम. वेल्लैयम्माल, उपमुख्याध्यापिका सदाफ शहाबाजकर, क्रीडा प्रशिक्षक आदित्य यादव, विद्यार्थी आणि पालकांनी त्याचे अभिनंदन केले.

## २८ वर्षांनंतर प्रथमच विश्वचषक हॉकी स्पर्धा भारतीय पंचांविना

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आगामी एफआयएच पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेत जवळपास तीन दशकांनंतर एकही भारतीय पंच किंवा तांत्रिक अधिकारी नसणार आहे. या प्रकारामुळे भारताच्या माजी आंतरराष्ट्रीय अधिकाऱ्यांनी तीव्र निराशा व्यक्त केली असून, पंचांसाठी योग्य संरचित मार्ग उपलब्ध करून देण्यावर भर देण्याची गरज व्यक्त केली आहे.

येत्या १४ ऑगस्टपासून नेदरलँड्स आणि बेल्जियम येथे सुरू होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेत १९९८च्या विश्वचषकानंतर प्रथमच एकही भारतीय पंच किंवा तांत्रिक अधिकारी दिसणार नाही. या स्पर्धेतील अधिकाऱ्यांच्या पॅनेलमध्ये युरोपीय देशांचेच वर्चस्व आहे. आधुनिक काळात भारताने केवळ चार पुरुष विश्वचषक पंच दिले आहेत, ज्यामध्ये अमरजित सिंह बावा, तरलोक सिंह भुल्लर, सतविंदर शर्मा आणि आर. व्ही. रघू प्रसाद यांचा समावेश आहे.

पंचांच्या व्यवसायात अजूनही आर्थिक सुरक्षितता आणि चांगल्या पगाराचा अभाव आहे. खेळाडूंना पुरस्कार आणि सरकारी नोकऱ्या मिळतात, मात्र पंचांना वेतन किंवा योग्य प्रोत्साहन मिळत नाही, ज्यामुळे तरुण या क्षेत्राकडे वळत नाहीत. भारताकडे देशांतर्गत ५० हून अधिक पंचांचा संच असतानाही एफआयएच पॅनेलवर केवळ सहा पुरुष आणि चार महिला पंच आहेत, तर तांत्रिक अधिकाऱ्यांमध्ये केवळ चार पुरुष आणि दोन महिलांचा समावेश आहे.

**रायगड जिल्ह्यातील १० खेळाडूंचा सहभाग | राज्यस्तरीय स्पर्धेत १५ पदकांची कमाई**

## 'शांतीदूत मर्दानी'ची दमदार कामगिरी

| पनवेल | प्रतिनिधी|

नाशिक येथील हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मृती उद्यान, गंगापूर रोड येथे ॲमेच्युअर मर्दानी युद्धकला असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पहिली महाराष्ट्र मर्दानी युद्धकला स्पर्धा २०२६ मध्ये रायगड जिल्ह्यातील शिव आधार सामाजिक सेवा संस्था संचालित शांतीदूत मर्दानी आखाड्याने दमदार कामगिरी केली. राज्यातील १८ जिल्ह्यांतील खेळाडू सहभागी झालेल्या या स्पर्धेत आखाड्याच्या १० खेळाडूंनी तब्बल १५ पदकांची कमाई केली.




प्री-ज्युनियर गटात जिजा श्रीकांत धुमाळ हिने एकेरी काठी प्रकारात रौप्यपदक पटकावले. तिच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत तिला लहान रणरागिणी म्हणून 'आदर्श विद्यार्थी' ट्रॉफी देऊन विशेष गौरविण्यात आले. ईशान सागर घोरपडे याने भाला प्रकारात सुवर्णपदक मिळविले. मुद्रा मंगेश पवार हिने एकेरी काठीमध्ये रौप्य, तर सानवी सागर सूर्यवंशी हिने कांस्यपदक पटकावले. सब-ज्युनियर गटात ईश्वरी सागर घोरपडे हिने एकेरी काठीमध्ये सुवर्ण, तर भाला आणि दानपट्टा प्रकारात प्रत्येकी रौप्यपदक मिळवत लक्षवेधी कामगिरी केली.

शुभ्रा सदानंद शिरसकर हिने एकेरी काठीमध्ये कांस्य व दानपट्टा प्रकारात रौप्यपदक मिळविले. कावेरी वैभव झगडे हिने एकेरी काठी आणि दानपट्टा या दोन्ही प्रकारांत कांस्यपदक पटकावले. वीर कुमार श्रीराम याने एकेरी काठी आणि तलवार या दोन्ही प्रकारांत रौप्यपदक मिळविले. आदिती अमित सोनवणे आणि अनिश अमोल शिंदे यांनी एकेरी काठी प्रकारात कांस्यपदक पटकावले. या सर्व खेळाडूंना शांतीदूत मर्दानी आखाड्याच्या प्रशिक्षिका अश्विनी घोरपडे यांचे मार्गदर्शन लाभले. विशेष म्हणजे, या राज्यस्तरीय स्पर्धेत अश्विनी घोरपडे यांची पंच म्हणूनही निवड करण्यात आली होती.

पारंपरिक मर्दानी युद्धकलेचा वारसा जपत नव्या पिढीतील खेळाडूंना प्रशिक्षण देण्याचे काम आखाड्याच्या माध्यमातून सुरू आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत मिळालेल्या या यशामुळे शांतीदूत मर्दानी आखाड्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)